पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

14 वर्ष वर्धापन दिन


अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३२९ ■ सोमवार, दि. ८ जून २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# शेतकऱ्यांनी 15 जूनपर्यंत पेरणीची घाई करू नये- कृषीमंत्री

प्रतिनिधी ८ जून

**मुंबई :** गेल्या तीन ते चार महिन्यांपासून सुरू असलेल्या असह्य उष्णतेमुळे आणि उकाड्यामुळे नागरिक त्रस्त झाले असून मान्सूनच्या पावसाची वाट पाहत आहेत. सध्या मान्सून दक्षिण कोकणात दाखल झाला असून सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांतील काही भागांमध्ये ९ जूनपर्यंत मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. मात्र, त्यानंतर किमान १५ जूनपर्यंत राज्यातील पावसाचा एकंदरीत जोर तसेच मान्सूनच्या प्रगतीचा वेग कमी होण्याची शक्यता हवामानाच्या सध्याच्या अंदाजातून दिसून येत आहे. त्यामुळे या कालावधीत राज्यात सर्वत्र समाधानकारक पावसाची शक्यता कमी असल्याची माहिती मुख्यमंत्री कार्यालयाकडून



देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे कृषी मंत्री दत्ता भरणे यांनी विविध महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर प्रतिक्रिया दिली आहे.

दत्ता भरणे म्हणाले की, 'मी राज्यातील सर्व शेतकऱ्यांना सांगतो की, १२ जून ते १५ जून दरम्यानच्या पावसाचा अंदाज घेऊनच शेतकऱ्यांनी पेरणी करावी. सध्यातरी मराठवाडा आणि खान्देश भागात सर्वदूर पाऊस पडणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी पावसाचा योग्य अंदाज घेऊनच पेरणी करावी, घाई करू नये,' असे आवाहन त्यांनी केले आहे.

'मे आणि जून महिन्यांत राज्यातील काही ठिकाणी वादळी पाऊस झाला, ज्यामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. विशेषतः जळगाव, अमरावती आणि बुलढाणा या भागांत पिकांचे अधिक नुकसान झाले आहे. राज्यातील एकूण २४ जिल्ह्यांना या वादळी पावसाचा फटका बसला असून, सुमारे १ लाख ४० हजार हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले आहे. शेतीसोबतच लोकांच्या घरांचे देखील नुकसान झाले आहे. या संदर्भात मी सर्व ठिकाणचे पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत, जेणेकरून बाधित शेतकऱ्यांना लवकरात लवकर सरकारी मदत करता येईल,' असे दत्ता भरणे यांनी म्हटले.

# परिवहन मंत्र्यांच्या दौऱ्यापुर्वी ट्राफिक पोलिसांना आली जाग

प्रतिनिधी ८ जून

**अकोला :** नेते आणि मंत्र्यांचे दौरे हे प्रशासनासाठी कसे 'टॉनिक' ठरतात, याचा जिवंत प्रत्यय आज अकोलेकरांना आला. अकोल्याचा मुख्य केंद्रबिंदू असलेल्या टॉवर चौकात रोज सामान्य जनतेला त्रस्त करणाऱ्या अवैध प्रवासी वाहतुकीचा गाशा आज पोलिसांनी अवघ्या काही तासांत गुंडाळायला लावला. कारण काय? तर आज राज्याचे परिवहन मंत्री अकोला दौऱ्यावर येत आहेत ! मंत्र्यांच्या या 'दरारा' आणि धास्तीमुळे रोज सुस्त असणारे वाहतूक पोलीस आणि रामदास पेठ पोलीस अचानक प्रचंड सक्रिय झाल्याचे पाहायला मिळाले.

टॉवर चौकातून रोज शेकडो अवैध खाजगी वाहने प्रवाशांची ने-आण करतात. रस्त्याच्या मधोमध वाहने उभी करणे, वाहतुकीचे नियम पायदळी तुडवणे आणि यामुळे होणारी प्रचंड वाहतूक कोंडी हे अकोलेकरांचे रोजचे मरण झाले आहे. रामदास पेठ पोलीस ठाणे अगदी हाकेच्या अंतरावर असताना आणि वाहतूक पोलिसांची चौकात ड्युटी असतानाही या अवैध वाहतुकीकडे वर्षानुवर्षे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. प्रादेशिक परिवहन अधिकारी ( आर टी ओ ) कार्यालय तर या अवैध वाहतुकीबाबत सुस्तच असल्याचे चित्र आहे. मंत्र्यांच्या दौऱ्यापुरता केलेला हा देखावा उद्या मंत्री जाताच पुन्हा जैसे थे होणार की पोलीस ही शिस्त कायम ठेवणार, याकडे आता संपूर्ण अकोल्याचे लक्ष लागले आहे.

### अकोल्याचा टॉवर चौक एका दिवसात अवैध वाहतूक मुक्त !



### मंत्र्यांच्या भीतीने यंत्रणा हलली

आज परिवहन मंत्र्यांचा अकोला दौरा असल्याने पोलिसांचे धाबे दणाणले. मंत्र्यांच्या ताफ्याला कुठेही अवैध वाहने दिसू नयेत आणि आपली 'बदनामी' होऊ नये, यासाठी सकाळीच रामदास पेठ पोलीस आणि ट्रॅफिक पोलिसांनी टॉवर चौकात धडक मोहीम राबवली. रोज ठाण मांडून बसणाऱ्या शेकडो खाजगी वाहनांना हुसकावून लावत चौक चकाचक करण्यात आला. 'टॉवर चौकातील हा मोकळा श्वास पाहून अकोलेकर जनतेने प्रशासकीय ढोंगावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. जर पोलीस एका दिवसात हा चौक अवैध वाहतुकीपासून मुक्त करू शकतात, तर मग रोज नागरिकांना का वेठीस धरले जाते? पोलिसांना जनतेच्या त्रासापेक्षा मंत्र्यांची सुरक्षा आणि इभ्रत जास्त महत्त्वाची आहे का?' असा सवाल नागरिक विचारत आहेत. या त्रासाला कंटाळलेल्या अकोलेकरांनी आता, 'परिवहन मंत्र्यांनी रोजच अकोल्यात यावे, जेणेकरून आम्हाला रोज या कोंडीतून मुक्ती मिळेल,' अशी खोचक मागणी केली आहे.

# जेव्हा परिवहनमंत्री स्वच्छता गृहाची पाहणी करतात...



## आस्थेने केली प्रवाशांची चौकशी

प्रतिनिधी ८ जून

**अकोला:** परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केवळ मध्यवर्ती आगाराची कोरडी पाहणी केली नाही, तर त्यांनी बसस्थानकाचा कोपरा अन कोपरा बारकाईने तपासला. अगदी स्वच्छता गृहात भेट देत पाहणी केली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, बसची वाट पाहत बसलेल्या सर्वसामान्य प्रवाशांजवळ जाऊन त्यांनी थेट संवाद साधला. महाविद्यालयीन तरुणींसोबत संवाद साधत काय एस.टी.प्रवासात काय त्रुटी आहे, काय सुधारणा केली पाहिजे याची चौकशी केली. मंत्र्यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर बसस्थानकाच्या इतिहासात पहिल्यांदाच चक्क अत्याधुनिक स्वच्छता करणारी मशिन तिथे धावताना दिसली. एरवी कचरा आणि अस्वच्छतेने माखलेले प्लॅटफॉर्म्स अगदी चकाचक करण्यात आले होते. कारवाईच्या भीतीने का होईना, पण प्रशासनाने घेतलेली ही तत्परता प्रवाशांसाठी सुखद धक्का ठरली.









# वालचाळे परिवाराची 10 पिढ्यांची वंशावळ पुस्तिका विमोचन व स्नेहमिलन सोहळा

प्रतिनिधी ८ जून



**अकोला :** अलीकडेच अकोला येथील जुन्या शहरातील पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर भवनात, वालचाळे परिवाराच्या वंशावळ पुस्तिकेचे विमोचन व स्नेहमिलनाचा एक अनोखा कार्यक्रम झाला. विशेष म्हणजे वंशावळ पुस्तिकेमध्ये दहा पिढयांची सविस्तर माहिती संकलित केलेली आहे.

म्हणजेच वालचाळे परिवाराचे ज्ञान असलेले मूळ पुरुष हे थेट शहाजीराजे, छत्रपती शिवाजी राजेंच्या कालखंडात होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परिवारातील सेवानिवृत्त न्यायाधीश माणिकराव वालचाळे होते. व्यासपीठावर परिवारातील जेष्ठ सदस्यांची उपस्थिती होती. जेष्ठांच्या हस्ते दीप प्रज्वलन तसेच प.पू. आर्यनंदी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमाला प्रारंभ झाला. या स्नेहमिलना करिता संपूर्ण महाराष्ट्रातून जवळपास ५३ कुटूंबातील जेष्ठ, तरुण व बाल सदस्य असे दोनशेच्या वर सदस्य सहभागी झाले होते. सर्वत्र विखुरलेल्या कुटूंबियांच्या परस्पर थेट परिचय व्हावा या दृष्टीकोनातुन प्रत्येक कुटूंबाला परिचय देण्याकरीता व्यासपीठावर आमंत्रित करण्यात आले होते. मोहनलालजी वालचाळे हे ९३ वर्षाचे सर्वात जेष्ठ सदस्य आवर्जून व उत्साहात उपस्थित होते.

कार्यक्रमा दरम्यान सदस्यांनी आपल्या भावना मनोगतातून व्यक्त केल्या. वाशिमच्या सन्मती अभियांत्रिकी महाविद्यालय व बार्शिटाकळी येथील वैशाली बायोफयुएल्य या प्रतिष्ठयानांच्या सर्वेसर्वा ॲड वैशाली वालचाळे यांनी छोटया कुटूंबांच्या एकत्रित भव्य अशा परिवाराने भविष्यात, समन्वय संपर्क व सहकार्य या त्रिसूत्रितुन दृढ बंधनात रहावे असे आवाहन केले. अकोला शहरातील तीव्र उन्हाळा असूनही सहभागी कुटूंबियांचा उत्साह वाखणण्याजोगा होता. १० पिढयांचा वारसा एकत्र गुंफून वालचाळे परिवाराने समाजासमोर एकतेचा अनोखा आदर्श ठेवला आहे. हा उपक्रम येणाऱ्या पिढयांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल.

## शेतकऱ्यांच्या नजरा आता आभाळाकडे

**अकोला :** रोहिणी नक्षत्र संपून मृग नक्षत्रास प्रारंभ झाला असला तरी पावसाचा पत्ता नसल्याने शेतकरी वर्ग चिंतेत सापडला आहे. अनेक शेतकऱ्यांनी पेरणीची तयारी करून ठेवली असून, चांगला पाऊस झाल्यास मृगातच पेरणी आटोपण्याचा त्यांच्या मनसुब्यावर पाऊस न आल्याने पाणी फेरले आहे.

खरीप हंगाम तोंडावर आल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात शेतकऱ्यांनी खरीप पेरणीची तयारी सुरू केली असून, पेरणीसाठी शेती मशागतीच्या कामांना गती आली आहे. १ जूनपासून पावसाळा सुरू झाला असून, पेरणीलायक पाऊस पडल्यानंतर जिल्ह्यात खरीप पेरणीला सुरुवात होणार आहे. मात्र पावसाळी वातावरण तयार होऊनही अद्याप पाऊस न आल्याने शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागल्या आहेत.

## वादळी वाऱ्याने वीज पुरवठा खंडित

**अकोला :** सध्या पावसाला सुरूवात झाली नसली तरी पावसाळी वातावरण तयार झाले असून, दररोज संध्यकाळच्या सुमारास सोसाट्याचा वारा सुटत असल्याने अनेक भागातील वीज पुरवठा खंडित होत आहे. तसेच रात्रीच्या वेळीदेखील वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना उकाड्याचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे त्यांच्यामध्ये तीव्र नाराजी पसरत आहे. तासनतास वीज नसल्यामुळे घरगुती, व्यावसायिक तसेच दैनंदिन कामकाजावर परिणाम होत असून, नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, हवामानातील किरकोळ बदल किंवा थोडा जरी वारा सुटला तरी वीज पुरवठा बंद होत आहे की करण्यात येतो हे समजत नसल्याने अनेक नागरिक संभ्रमात आहेत.

## अखेर गाय चोरी प्रकरणात शहर पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल

प्रतिनिधी ८ जून

**मुर्तीजापुर :** अखेर गाय चोरी प्रकरणात शहर पोलिस स्टेशन मध्ये ६ जून रोजी दुपारी गुन्हा दाखल करण्यात आला.

फिर्यादी अन्वर खान हनीफ खान व्यवसाय गाय संगोपन व दूध विक्री करणे राहणार स्टेशन विभाग मुर्तीजापुर यांनी दिलेली तक्रारीत नमूद केले आहे की १९/ ५/ २०२६ रोजी संध्याकाळी गाभण गाय टेलिफोन कॉलनी येथील शमशान भूमी जवळ असलेल्या गोठ्याच्या बाहेर बांधलेली होती किंमत ४५००० रंग लालसर लाल धामणी साईवाल जर्सी क्रॉस जातीची होती दिनांक २० ५ २०२६ रोजी सकाळी सात वाजता गाईचा दूध काढण्यासाठी अन्वर खान व त्यांची पत्नी गोठ्या कडे गेले असताना गाभण जर्सी क्रॉस साईवाल गाय दिसत नसल्यामुळे त्यांना असे वाटले की गाय दोर तोडून गेली असेल यासंदर्भात गायीचा संपूर्ण परिसरात दोन-तीन दिवस शोध घेतला पोलिसांना माहिती दिली परंतु गाय दिसून आली नाही गाईचे संगोपन व दूध विक्री करून आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह करणारे अन्वर खान यांची तब्येत बिघडली त्यामुळे ६ जून २०२६रोजी मुर्तीजापुर शहर पोलीस स्टेशनमध्ये फिर्यादी यांनी तक्रार दाखल केली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे पुढील तपास पोलीस करत आहे शहरात मोठ्या प्रमाणात गाय चोरीचे प्रमाण वाढले आहे पोलिसांनी उपाययोजना करून चोरट्यांना ताब्यात घ्यावा आणि कारवाई करावी व पशुपालन संगोपन करणाऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी जोर धरत आहे.

## तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या

प्रतिनिधी ८ जून

**अकोला :** शहरातील जठारपेठ परिसरात ७ जून रोजी सिद्धिविनायक मंदिराजवळ असलेल्या गणराय अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या २० वर्षीय तरूणीने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे.

भूमिका श्याम धडगाव असे मृतक तरूणीचे नाव आहे. घटनेची माहिती मिळताच सिव्हिल लाइन पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप समोर आले नसून, पोलिसांकडून विविध दिशेने तपास सुरू करण्यात आला आहे. उखाणीने याबाबत कुटुंबीय तसेच जवळच्या व्यक्तींकडून माहिती घेतली जात आहे. याप्रकरणी सिव्हिल लाइन पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असन. शवविच्छेदन अहवाल आणि तपासानंतर आत्महत्येमागील कारण स्पष्ट होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. भूमिका श्याम धडगाव (२०) ही जठारपेठेतील गणराय अपार्टमेंटमध्ये आपल्या कुटुंबासोबत राहत होती. रविवारी तिने घरातच गळफास घेत आत्महत्या केल्याचे समोर आले. काही वेळाने ही बाब कुटुंबीयांच्या निदर्शनास आली. त्यांनी तिला खाली उतरवून उपचारासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल केले.

## अकोला कच्छी मेमन जमाततर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा

### अकोला कच्छी मेमन जमातचे अध्यक्ष जावेद झकरिया यांचे यशस्वी आयोजन

प्रतिनिधी ८ जून




**अकोला :** कच्छी मेमन जमाततर्फे १० वी व १२ वी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गौरवार्थ मेमन टॉवर, अकोला येथे भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाला समाजातील मान्यवर, पालक तसेच मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

कार्यक्रमाला आमदार साजिद खान पठाण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर माजी उपमहापौर रफीक सिद्दीकी हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ मेमन जमातचे अध्यक्ष बिलालभाई ठेकिया होते. यावेळी राहत को-ऑपरेटिव्ह बँकेचे उपाध्यक्ष मोहम्मद युनुस शेख बुधन, अकोला कच्छी मेमन जमातचे अध्यक्ष जावेद झकरिया, कच्छी मेमन जमातचे माजी अध्यक्ष हाजी इक्बाल विंधानी तसेच हाजी रफीक गाजी हे व्यासपीठावर प्रमुख उपस्थित होते. अकोला कच्छी मेमन जमातचे अध्यक्ष जावेद झकरिया यांनी जमाततर्फे राबविण्यात येणाऱ्या सामाजिक, शैक्षणिक व जनहिताच्या उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे व त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सहकार्य करणे ही जमातची प्राथमिकता असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शनही त्यांनीच केले.

समारंभात १२ वी परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविणारे मोहम्मद रेहान मोहम्मद फहीम, मोहम्मद अयान मोहम्मद इमरान, मोहम्मद फैजान इमरान हडपा, मोहम्मद अयान मोहम्मद जुनैद शेखानी, सना बानो मोहम्मद जुनैद शेखानी, अमेना मोहम्मद सलीम, सना फिरदौस मोहम्मद शब्बीर, माहेक जावेद थड्डी, आक्सा बानो मोहम्मद अकबर बावानी, सहारा तनवीर इम्तियाज घांची, वजीहा मोहम्मद रिजवान मलाक, फैज फिरोज जाखुरा, तस्मिया परवीन मोहम्मद इमरान आणि अफीफा जोया मोहम्मद जावेद बेगावाला यांचा सत्कार करण्यात आला.

तसेच एसएससी परीक्षेत उत्कृष्ट यश मिळविणारे रुकैया बानो मोहम्मद यासीन बचाव, फातेमा मोहम्मद सलीम, कौसर फातेमा मोहम्मद हुसैन, मोहम्मद अमन मोहम्मद इलियास शेखानी, मोहम्मद मोईन मोहम्मद शब्बीर शेखानी, नौमान फारूक गनोडवाला, रुमेशा बिलाल अहमद गिगानी, मोहम्मद जियान मोहम्मद जावेद सुरिया, जोया बानो मोहम्मद अबरार गाजी, आक्सा बानो मोहम्मद अजीम, रोजमिन मोहम्मद इरफान, मोहम्मद अहमद रजा अनस तबानी, मोहम्मद सुफियान अब्दुल रशीद मुसानी, बुशरा मोहम्मद इरफान डोकडिया, जैनब फातेमा मोहम्मद सिराज जावेरी आणि सना मोहम्मद शरीफ थड्डी यांचा गौरव करण्यात आला.याप्रसंगी हाफिज हम्माद मलाक यांचा 'हाफिज-ए-कुरआन' झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र व स्मृतिचिन्ह देऊन त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जमातचे सचिव सलीम गाजी, हाजी यासीन बचाव, हनीफ़ मलक, सहसचिव वाहिद मुसानी, सदस्य अकील घांची, समीर भुरानी, अझाज डोकडिया, सुफियान डोकडिया, हुसैन मुसानी, इम्तियाज गनोदवाला तसेच असलम गाजी यांनी विशेष परिश्रम घेतले. याशिवाय ठेकिया परिवार, विंधानी परिवार, गाजी परिवार, संडा परिवार आणि झकरिया परिवार यांचेही मोलाचे योगदान लाभले.विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याच्या शुभेच्छांसह कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## गांधी चौकात चोरट्यांचा धुमाकूळ; आइस्क्रीम पार्लरच्या गल्ल्यातील ७० हजारांची रोकड लंपास

प्रतिनिधी ८ जून

**अकोला :** शहरातील गांधी चौक परिसर सध्या वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे चर्चेत आला आहे. गांधी चौपाटी परिसरातील न्यू नॉव्हेल्टी आइस्क्रीम दुकानाच्या गल्ल्यातून अज्ञात चोरट्यांनी ७० हजार रुपयांची रोकड लंपास केली.

या घटनेची माहिती दुकानाचे मालक अनुप शर्मा यांनी दिली असून, चोरीची घटना सिटी कोतवाली पोलीस ठाण्याच्या अगदी जवळ घडल्याने सर्वत्र आश्चर्य व्यक्त केले जात आहे. विशेष म्हणजे, या परिसरात गेल्या काही दिवसांपासून चोरी, पाकीटमारी आणि मोबाइल हिसकावण्याच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचा आरोप स्थानिक व्यापारी आणि नागरिकांकडून केला जात आहे.

**महिलेच्या पर्समधून सोन्याचे मंगळसूत्र चोरले :** दोन दिवसांपूर्वीच इंदोरी गल्ली परिसरात एका महिलेच्या पर्समधून सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेण्याची घटना घडली होती. त्यानंतर लगेचच आइस्क्रीम पार्लरमधील चोरीमुळे गुन्हेगारांचे मनोबल वाढल्याची चर्चा शहरभर रंगली आहे. गांधी चौक, चौपाटी आणि मुख्य बाजारपेठ परिसरात नागरिकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. तरीही येथे पॉकीटमारी, दुचाकी चोरी, मोबाइल हिसकावणे आणि दुकानांमधील चोरीच्या घटनांनी डोके वर काढले आहे. दिवसाढवळ्याही अशा घटना घडत असल्याने व्यापारी आणि ग्राहकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.


**महिलेला अमानुष मारहाण करणारा आरोपी मोकाट**

शहरातील गांधी मार्गालगत असलेल्या चौपाटी येथे गेल्या तीन दिवसांपूर्वी एका महिलेसह तिच्या कुटुंबीयांना झालेल्या अमानुषपणे मारहाण करण्यात आली होती. या प्रकरणातील आरोपी अद्यापही मोकाट असल्याने पोलिसांच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचा आरोप अकोलेकरांमधून होत आहे.

**वाढत्या गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी जिल्हा पोलीस प्रशासनाने स्वतः पुढाकार**

स्थानिक नागरिकांच्या मते, या भागात नियमित आणि प्रभावी पोलीस गस्त होत नसल्यामुळे चोरट्यांचे धाडस वाढले आहे. सिटी कोतवाली पोलीस ठाणे काही अंतरावर असतानाही गुन्हेगार राजरोसपणे वारंवार हात साफ करत असल्याने पोलीस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. गांधी चौक परिसरात विशेष गस्त पथके तैनात करून सीसीटीव्हीच्या आधारे चोरट्यांचा शोध घेण्यात यावा, तसेच व्यापारी आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी शहरातील व्यापारी संघटना आणि नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

## शहरातील उघड्या डीपी बनल्या धोकादायक




प्रतिनिधी ८ जून

**बार्शीटाकळी :** हे तालुका ठिकाण असूनही येथे महावितरण कंपनीचा भोंगळ कारभार दिसून येत आहे. तहसील कार्यालय समोरील डीपीचे झाकण गायब झाले असून डीपी पूर्णतः उघडी आहे. तसेच या डीपीवरचे लोड वाढले असून वारंवार फ्युज जात आहे. या डीपीवर फ्युज टाकण्याकरिता कोणीही टेक्निशियन येत नाही. ऑपरेटरचे असे म्हणणे आहे की आपण कार्यालयीन अधिकारी यांच्यासोबत संपर्क साधा. अधिकारी म्हणतात लाईनमन सोबत संपर्क साधा. काहीही ताळमेळ नाही परंतु समस्या वाढत आहे. तहसील कार्यालयाच्या डीपीचे इतके बेहाल झाले आहेत या डीपीचे केबल बदलण्याऐवजी केबल मध्ये चक्क नळाची पाईप टाकून दिली. हे पाईप उष्णता आणि वाढत्या लोड मुळे कधीही एकमेकांना चिटकून मोठी हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच या डीपी जवळ जनावरे चरतात. तहसील कार्यालय जवळील दुकानदारांची अशी मागणी आहे की या डीपीवरील मेंटेनन्सचे काम पावसाळ्यापूर्वी करून केबल बदलून देण्यात यावी. जेणेकरून पावसाळ्यात दुकानदारांची लाईन बंद होणार नाही व तहसील कार्यालयाची लाईन जाणार नाही.

## नाईक होमिओपॅथीमध्ये होतोय असाध्य आजारांवर उपचार

प्रतिनिधी ८ जून





**अकोला येथे 40 वर्षांपासून वैद्यकीय सेवेत सेवारत**

**अकोला :** येथील प्रसिद्ध डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये थायरॉईड, लठ्ठपणा, ॲसिडिटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधिवात , मायग्रेन सारख्या असाध्य आजारांवर उपचार घेऊन रुग्ण आता निरोगी जीवन जगत आहेत. ॲडव्हान्स होमिओपॅथीच्या उपचारामुळे आतापर्यंत हजारो रुग्णांना मोठा फायदा झाला आहे.

गेल्या ४० वर्षांपासून डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये शरीराच्या सर्व आजारांवर संपूर्ण आणि यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रुग्णांना इतर ठिकाणी उपचार घेऊनही फरक पडलेला नाही, अशा रुग्णांनी एकदा येथे नक्कीच भेट दिली पाहिजे.अधिक माहितीसाठी रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक ९१७५९५७१२९ किंवा ९१३००१६१२९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात, तसेच Naikhomoeopathy.com (Youtube) वर अधिक माहिती मिळवू शकतात. येथे उपचार घेऊन पूर्णपणे बऱ्या झालेल्या एका महिला रुग्णाने आपला अनुभव व्यक्त केला आहे.

'मी नाईक होमिओपॅथीमध्ये येण्यापूर्वी मला थायरॉईडचा खूप त्रास होता. मला प्रचंड थकवा जाणवायचा, धाप लागायची, चिडचिड व्हायची, झोप येत नव्हती आणि माझे वजनही वाढत होते. या आजारामुळे मी पार कंटाळले होते. आता नाईक होमिओपॅथीमधून ३ महिन्यांचे औषध घेतल्यावर मला खूप छान वाटत आहे. या काळात माझे वजन ६ किलोने कमी झाले आहे. सध्या मला नाईक होमिओपॅथीच्या औषधामुळे ७० टक्के आराम वाटत आहे. मी नाईक होमिओपॅथीचे मनापासून आभार मानते.





**जिल्हा पदाधिकारी व एसआयआर मार्गदर्शन शिबिर उत्साहात..**

अकोला : शहरातील गोरक्षण रोडवरील शुभमंगल मंगल कार्यालयात शिवसेनेच्यावतीने अकोला जिल्हा पदाधिकारी व एसआयआर मार्गदर्शन शिबिर सोमवारी उत्साहात पार पडले. या शिबिराचे उद्घाटन परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते संबोधित करीत मार्गदर्शन केले. या शिबिराला माजी आ. गोपिकिसन बाजोरिया, जिल्हा संपर्क प्रमुख राजन साळवी, विठ्ठल सरप यांच्यासह शहरातील गणमान्य नागरिक उपस्थित होते. यामध्ये महिला वर्गाची लक्षणिय उपस्थिती दिसून आली.

## शेतात बांधलेल्या गोह्याची चोरी नवथळ शेतशिवारातील घटना

**बाळापूर :** शेतात बांधलेल्या गोऱ्हयाची चोरी झाल्याची घटना उरळ पोलीस स्टेशन हद्दीत नवथळ शेतशिवारात घडली. याबाबत पोलिसांनी अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला आहे. नवथळ येथील विनोद रामेश्वर वावरे यांनी त्यांचा गो-हा शेतात नेऊन बांधला होता. संध्याकाळी पाच वाजता ते शेतात गोह्याला आणण्यासाठी गेले असता तिथे त्यांना गोहा दिसला नाही.

**CHANGE IN NAME**

WANT TO CHANGE FATHER NAME FROM **SHAMA PARVEEN A. RAUF** TO **SHAMA PARVEEN ABDUL RAUF**

ADRESS RAHEMAT NAGAR JUNI BASTI MURTIZAPUR DIST. AKOLA

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ 5226

**मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय**

**गायत्री नगर, अकोला**

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

**इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.**

- इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार

**वैशिष्ट्ये :**

- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा



पत्ता : मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय

मो. 9921186715, 9511254959, 9421895790,9960437366

अभिष्टचिंतन सोहळा







सामाजिक, राजकीय, आध्यात्मीक, शैक्षणिक,
रोखठोक व्यक्तिमत्व
विद्यावाचस्पती

# प्रा. दिलीप जोशी सरांना

वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा

| | | | |
|---|---|---|---|
| आतिश देशमुख | श्याम दुरतकर | सैय्यद इरफान | मनोज सुतवणे |
| राजु जितकर | ॲड. परमेश्वर इंगळे | ॲड. सुरेश टेकाडे | अतुल इंगळे |
| शिवाजी वटाणे | दिपक भालेराव | बंटी शेठी | श्रीकांत जोशी |
| मनोज जोशी | अशोक बोद्रे | ज्ञानेश्वर जोशी | एकनाथ जोशी |

रोखठोक' जनजागरण मंच वाशीम

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

सोमवार, दि. ८ जून २०२६ https://epaper.citynewssuperfast.com


# नो पार्किंग झोनमधील 22 अवैध प्रवासी वाहनांवर कारवाई

## उमरखेड आगार व वाहतूक शाखेची संयुक्त मोहीम

प्रतिनिधी ८ जून



**उमरखेड :** राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानक परिसरातील नो पार्किंग झोनमध्ये अवैधरित्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांविरोधात उमरखेड आगार प्रशासन आणि वाहतूक पोलिसांनी संयुक्त कारवाई मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेदरम्यान २२ खासगी प्रवासी वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

राज्याचे परिवहन मंत्री Pratap Sarnaik तसेच विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या निर्देशानुसार ५ ते १५ जून या कालावधीत राज्यभरातील बसस्थानक परिसरात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत यवतमाळ विभागातील उमरखेड बसस्थानक परिसरातही कारवाई करण्यात आली.

सुरक्षा व दक्षता अधिकारी महेंद्र वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली आगार व्यवस्थापक प्रमोदिनी किनाके आणि वाहतूक सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल गुंडे यांच्या संयुक्त पथकाने बसस्थानकाच्या २०० मीटर परिघातील नो पार्किंग झोनची तपासणी केली. यावेळी नियमांचे उल्लंघन करत प्रवासी वाहतूक करणारी २२ खासगी वाहने आढळून आली. संबंधित वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

बसस्थानक परिसरात खासगी वाहनांचा गोंधळ, वाहतूक कोंडी आणि प्रवाशांची गैरसोय यामुळे एसटीच्या उत्पन्नावर परिणाम होत असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. या कारवाईमुळे बसस्थानक परिसरातील शिस्त राखण्यास मदत होणार असून एसटी महामंडळाच्या उत्पन्नातही वाढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, १५ जूनपर्यंत ही संयुक्त मोहीम सुरू राहणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचा इशारा संबंधित अधिकाऱ्यांनी दिला आहे.

## दोन दुचाकींची धडक; दोघांची प्रकृती चिंताजनक

प्रतिनिधी ८ जून

**महागाव :** नागपूर–तुळजापूर राज्य महामार्गावरील आंबोडा ब्रिजजवळ शुक्रवारी (दि. ६ जून) रात्री झालेल्या भीषण अपघातात दोन दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले. समोरासमोर झालेल्या जोरदार धडकेत दोन्ही मोटारसायकलींचे मोठे नुकसान झाले असून जखमींवर विविध रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. माहितीनुसार, रात्री साडेनऊ वाजताच्या सुमारास आंबोडा ब्रिजवरील धोकादायक वळणावर विरुद्ध दिशेने येणाऱ्या दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार टक्कर झाली. धडक इतकी तीव्र होती की दोन्ही चालक रस्त्यावर फेकले गेले आणि गंभीर जखमी झाले. या अपघातात अमोल तळणकर (रा. करंजी) यांना गंभीर दुखापत झाली. त्यांना प्रथम महागाव ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी नागपूर येथील उच्चस्तरीय रुग्णालयात हलविण्यात आले. दुसरे जखमी शैलेश गरड (रा. आंबोडा) यांना महागाव येथील खासगी रुग्णालयात प्राथमिक उपचार देण्यात आले. त्यानंतर अधिक उपचारासाठी त्यांना यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना तातडीने मदत केली. या घटनेमुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

# दरोड्यातील सात आरोपी जेरबंद



## 3.10 लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी ८ जून

**यवतमाळ :** वडगाव जंगल पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अकोला बाजार परिसरात व्यापाऱ्यावर हल्ला करून रोख रक्कम लुटणाऱ्या टोळीचा यवतमाळ पोलिसांनी अवघ्या 24 तासांत पर्दाफाश केला. या प्रकरणात सात आरोपींना अटक करण्यात आली असून चोरीस गेलेली रोख रक्कम आणि गुन्ह्यात वापरलेली दुचाकी वाहने असा एकूण 3 लाख 10 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 5 जून रोजी रात्री सुमारे 8 वाजता अकोला बाजार येथील व्यापारी सैय्यद एजाज मुसा हे त्यांचे केजीएन कन्फेसरी किराणा दुकान बंद करून दुकानातील 55 हजार रुपयांची रोख रक्कम घेऊन दोन कामगारांसह मोपेडवरून रुई वाई येथे घरी जात होते. दरम्यान, बोरीसिंह शिवारात चार अज्ञात इसमांनी दोन दुचाकींवरून त्यांचा पाठलाग करून अंधाराचा फायदा घेत लोखंडी रॉडने हल्ला केला. व्यापाऱ्याला जखमी करून दुचाकीच्या डिकीत ठेवलेली 55 हजार रुपयांची रोख रक्कम जबरदस्तीने काढून आरोपी पसार झाले.

या प्रकरणी कामगार सोहेल युसुफ कुरेशी यांच्या फिर्यादीवरून वडगाव जंगल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक कुमार चिंता आणि अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांनी घटनास्थळी भेट देत स्थानिक गुन्हे शाखा व वडगाव जंगल पोलिसांची पाच विशेष पथके तयार करून आरोपींच्या शोधासाठी रवाना केली.

तपासादरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे शेख हुसेन शेख मेहबूब (वय 28, रा. रुई) याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने इतर साथीदारांसह गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे दारव्हा येथून राहुल कवळे, शुभम तुरे, आकाश चव्हाण, रोहन राठोड, सैय्यद साजेब आणि विशाल मेश्राम यांना ताब्यात घेतले.

आरोपींकडून चोरीची रोख रक्कम तसेच गुन्ह्यात वापरलेली दुचाकी वाहने जप्त करण्यात आली. एकूण 3 लाख 10 हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून पुढील तपास वडगाव जंगल पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बेसाने व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चव्हरे यांच्या मार्गदर्शनाखाली वडगाव जंगल पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

# बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालयाचा पर्यावरण उपक्रम

प्रतिनिधी ८ जून

**पुसद :** विश्व पर्यावरण दिनानिमित्त जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचालित बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने शहरात अत्याधुनिक वायू प्रदूषण मापन व जनजागृती अभियान राबविण्यात आले. पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी हा उपक्रम नागरिकांच्या विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.

या अभियानांतर्गत एलईडी डिजिटल प्रचार वाहनाद्वारे शहरातील प्रमुख चौक, सार्वजनिक ठिकाणे तसेच औद्योगिक परिसरात पर्यावरण संरक्षणाचे संदेश प्रसारित करण्यात आले. यासोबतच हवेमधील सूक्ष्म धूलिकण (PM 2.5 व PM 10), कर्बवायूचे प्रमाण, तापमान, आर्द्रता आणि ध्वनी प्रदूषणाचे मोजमाप करून नागरिकांना वायू गुणवत्तेबाबत माहिती देण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश वानखेडे आणि मानवशास्त्र व विज्ञान विभाग प्रमुख प्रा. रुचिर गोडबोले यांच्या संकल्पनेतून हा अभिनव उपक्रम साकारण्यात आला. संस्थात्मक नवोपक्रम परिषद (IIC) समन्वयक प्रा. एच. यू. भरखडा यांच्या मार्गदर्शनाखाली सिव्हिल अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. झीशान अहमद यांनी प्रकल्पाचे समन्वयन केले.

या अभिनव पर्यावरण जनजागृती मोहिमेबद्दल जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जय नाईक यांनी संपूर्ण टीमचे अभिनंदन करून पुढील काळातही अशाच उपक्रमांची अपेक्षा व्यक्त केली.

> ■ "आज मोजमाप करा, उद्याचे संरक्षण करा" या संदेशातून स्वच्छ हवा हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क असल्याची जाणीव करून देण्यात आली. पर्यावरण संरक्षणासाठी विज्ञान व तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# काँग्रेसला धक्का; साहेबराव कांबळेंसह शेकडो कार्यकर्ते शिवसेनेत

प्रतिनिधी ८ जून



**यवतमाळ :** उमरखेड-महागाव विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसला मोठा धक्का देत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस साहेबराव कांबळे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी रविवारी शिवसेनेत प्रवेश केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मुंबईतील नंदनवन निवासस्थानी हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.

राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रवेश झाल्याचे सांगण्यात आले. संजय राठोड यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघात झालेली विकासकामे, जनसंपर्क आणि सर्वसामान्यांशी असलेली बांधिलकी यामुळे अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेची वाट धरल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

पक्षप्रवेश कार्यक्रमाला विधान परिषदेचे आमदार दुष्यंत चतुर्वेदी, संपर्कप्रमुख श्रीधर मोहोड, जिल्हाप्रमुख यशवंत पवार, चितंगराव कदम यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शिवसेनेत प्रवेश करणाऱ्यांमध्ये सूर्यकांता दिंडाळकर, दत्त वानखेडे, राहुल मोहितवार, रामराव गायकवाड, मिलिंद धुळे, प्रफुल्ल खंदारे, विपीन पवार, विद्यानंद नलवाडे, पंजाबराव भालेराव, रविंद्र जाधव, कैलासराव घुगरे, संतोष चव्हाण, बाबुराव शिंदे, ज्ञानेश्वर कनवाळे, सचिन फळके, जगदीश सुरवशे, भागवत कदम, ओंकार मिराशे, चेतन कदम, सुनील राठोड, प्रवीण धोपटे, विमलताई शिगणकर, विजय साखरे, पवन बरडे, शिवाजी कवडे, दीपक केंदेकर, गौतम धुळे, राजू हाटकर, रघुनाथ खंदारे, संघदीप बरडे, किशोर इळजवार, ॲड. संतोष कांबळे, ॲड. राजीव भांगे पाटील, भारत राठोड, संजय भालेराव, रुपेश जाधव आदींसह शेकडो कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

या पक्षप्रवेशामुळे उमरखेड-महागाव मतदारसंघातील शिवसेनेची संघटनात्मक ताकद वाढणार असून आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाला बळ मिळेल, असा विश्वास मंत्री संजय राठोड यांनी व्यक्त केला.

# टाकळी रस्त्याची दुरवस्था;अपूर्ण कामामुळे चिखलाचे साम्राज्य

प्रतिनिधी ८ जून





**ठेकेदाराचे परवाना रद्द करण्याची मागणी**

**उमरखेड :** मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत सुरू असलेल्या टाकळी गावाच्या रस्त्याच्या कामाची पहिल्याच पावसात दुरवस्था झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अपूर्ण काम, ठिकठिकाणी पडलेले खड्डे, अर्धवट पुलांची कामे आणि चिखलमय झालेला मार्ग यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असून संबंधित ठेकेदारावर कारवाई करून त्याचा परवाना रद्द करण्याची मागणी होत आहे.

टाकळी गावाच्या रस्त्याचे काम मागील अनेक महिन्यांपासून संथगतीने सुरू आहे. रस्त्याच्या कामासाठी ग्रामस्थांनी यापूर्वी आंदोलन आणि उपोषण केले होते. त्यावेळी एप्रिल महिन्यापर्यंत रस्त्याचे शंभर टक्के काम पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन प्रशासन आणि संबंधित यंत्रणेकडून देण्यात आले होते. या आश्वासनानंतर ग्रामस्थांनी आंदोलन स्थगित केले होते. मात्र अद्यापही काम पूर्ण झाले नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

रस्त्यावरील काही पुलांची कामे खोदून ठेवण्यात आली असून पर्यायी मार्ग म्हणून शेतातून रस्ता काढण्यात आला आहे. काही ठिकाणी पुलांजवळ मोठे खड्डे पडले असून त्यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच रस्त्यावर सर्वत्र चिखल साचल्याने वाहनचालक, शेतकरी आणि विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे.

गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, वारंवार पाठपुरावा आणि आंदोलन करूनही काम पूर्ण होत नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कोट्यवधी रुपयांचा निधी विकासकामांसाठी मंजूर होत असताना टाकळी गावाचा रस्ता मात्र अद्याप अपूर्ण अवस्थेत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना आहे.

शाळकरी विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना दररोज या रस्त्यावरून प्रवास करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारांनाच पुन्हा पुन्हा कामे का दिली जातात, असा सवालही ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

दरम्यान, रस्त्याचे काम तातडीने पूर्ण न झाल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा टाकळी येथील ग्रामस्थांनी दिला आहे. प्रशासनाने त्वरित पाहणी करून निकृष्ट व अपूर्ण कामाची चौकशी करावी आणि नागरिकांना न्याय द्यावा, अशी मागणी होत आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांतूनच धम्मक्रांती शक्य : जगदीश शिंदे

## ज्ञानंभूमी चापर्डा येथे प्रशिक्षण शिबिराचा समारोप

प्रतिनिधी ८ जून



**कळंब :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतूनच तथागत बुद्धांच्या धम्माची खरी क्रांती घडू शकते. कारण या धम्मक्रांतीला विज्ञानाचा भक्कम आधार आहे, असे प्रतिपादन धम्म प्रशिक्षण शिबिराचे प्रमुख जगदीश शिंदे यांनी केले.

ज्ञानंभूमी, चापर्डा येथे आयोजित श्रामणेर, अनागारिक व अनागारिका प्रशिक्षण शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमात ते बोलत होते. बुद्धांनी सर्वप्रथम कर्मकांडाला नकार देत मानवी दुःखाची वैज्ञानिक कारणमीमांसा केली. मात्र बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर काही भिक्षूंमधील पुरोहितवादामुळे धम्म दैववादाकडे झुकला. अशा परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेल्या विचारांवर आधारित धम्मचळवळ उभी राहणे आवश्यक असून श्रामणेर, अनागारिक व अनागारिका वर्ग ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमोल भगत होते. प्रमुख अतिथी म्हणून रमेश जीवने आणि प्रा. इंदुताई नारनवरे उपस्थित होत्या.

दरम्यान, २७ ते ३१ मे या कालावधीत आयोजित पाच दिवसीय प्रशिक्षण शिबिरात एकूण ११० शिबिरार्थींनी सहभाग नोंदविला. शिबिराचे उद्घाटन जीवन रामटेके यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी डॉ. बोधी अशोक, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. अमोल श्रीरामे आणि उत्तम श्रीरामे उपस्थित होते.

२७ मे रोजी भदंत राहुल स्थविर, अध्यक्ष, अखिल भारतीय भिक्षू संघ, यवतमाळ यांनी सर्व श्रामणेर, अनागारिक व अनागारिका शिबिरार्थींना दीक्षा दिली. शिबिरात प्रा. डॉ. मिलिंद गजभिये, डॉ. अमोल श्रीरामे, अनिल कांबळे, प्रा. गंगाधर नाखले, प्रकाश कांबळे, डॉ. रश्मी बागडे, गजानन गजभारे, प्रा. विजया मुळे, डॉ. जगदीश हेंडवे, संदीप पानतावणे, अविनाश बोरकर आदींनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला परिसरातील धम्मप्रेमी, उपासक-उपासिका तसेच शिबिरार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अखेर उमरगाव (पोड)चा पाणीप्रश्न मार्गी

प्रतिनिधी ८ जून

**कळंब :** तालुक्यातील उमरगाव (पोड) येथील नागरिकांना गेल्या महिनाभरापासून तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत होता. मात्र या समस्येबाबत

दैनिक 'सिटी न्यूज सुपरफास्ट'मध्ये वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर ग्रामपंचायतीने तातडीने पावले उचलत गावातील पाणीपुरवठा पूर्ववत केला. त्यामुळे ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे.

गावात पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाल्याने नागरिकांना भर उन्हाळ्यात पाण्यासाठी भटकंती करावी लागत होती. या संदर्भात ३० मे रोजी वृत्त प्रसिद्ध झाले होते. त्यानंतर ग्रामपंचायत प्रशासन खडबडून जागे झाले. दुसऱ्याच दिवशी एका शेतकऱ्याच्या खासगी विहिरीतून नळयोजनेच्या विहिरीत पाणी सोडण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यानंतर १ जूनपासून गावात नियमित पाणीपुरवठा सुरू करण्यात आला.



उमरगाव (पोड) वासियांची पाण्यासाठी भटकंती; भीषण पाणीटंचाईमुळे नागरिक हैराण

प्रतिनिधी ३० मे

कळंब : तालुक्यातील उमरगाव (पोड) येथील नागरिकांना गेल्या महिनाभरापासून तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. नळयोजनेच्या विहिरी कोरड्या पडल्याने बेलोरी व उमरगाव (पोड) परिसरात पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. सुमारे 250 लोकवस्ती असलेल्या या गावात मोठ्या प्रमाणात आदिवासी बांधव वास्तव्यास आहेत. ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे ही परिस्थिती उद्भवल्याचा आरोप बेलोरी व उमरगाव (पोड) येथील ग्रामस्थांनी केला आहे. गांधीनगर, बेलोरी आणि उमरपोड या तीन गावांचा गट ग्रामपंचायतीत समावेश आहे. बेलोरी आणि उमरपोड गावांच्या दरम्यान असलेला पाझर तलाव पाण्याने लवकर आटल्याने परिसरातील विहिरींना पाझर मिळणे बंद झाले आहे. तसेच, तलावातील पाण्याचा शेतकऱ्यांनी मोटारपंपांच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणावर सिंचनासाठी वापर केल्याने पाणीपुरवठ्याच्या विहिरी आणि हातपंप कोरडे पडल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. उमरगाव (पोड) येथे केवळ एकच हातपंप असून त्यातूनही पुरेसे पाणी येत नसल्याने नागरिकांना दोन ते अडीच किलोमीटर अंतरावरून पाणी आणावे लागत आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत घरगुती वापर, धुणी-भांडी तसेच जनावरांसाठी पाण्याची गरज वाढली असताना उपलब्ध पाण्याचा तुटवडा नागरिकांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे.

दरम्यान, एवढी गंभीर पाणीटंचाई असतानाही प्रशासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. बेलोरी व उमरपोड येथील नागरिकांनी तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासह कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, बेलोरी आणि उमरगाव (पोड) दरम्यान असलेल्या पाझर तलावातील पाण्याचा वापर शेती आणि वीटभट्ट्यांसाठी मोठ्या प्रमाणात झाल्याने तलाव जानेवारी-फेब्रुवारी महिन्यातच कोरडा पडला. परिणामी भूजल पातळी घटली आणि गावातील विहिरींनी तळ गाठला. गावात केवळ एकच हातपंप असून त्यातूनही अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते.

दरम्यान, कळंबचे तहसीलदार Dheeraj Sthul यांनी उमरगाव (पोड) येथे भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. तसेच पाणीपुरवठा व्यवस्थेची माहिती घेत संबंधितांना आवश्यक सूचना दिल्या.

ग्रामस्थांनी सांगितले की, पाणीटंचाईचा प्रश्न मार्गी लागल्यानंतर हातपंपाचीही दुरुस्ती करण्यात आली. त्यामुळे गावातील नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

मात्र, या प्रकरणात ग्रामपंचायतीने उच्च अधिकाऱ्यांना चुकीची माहिती दिल्याचा आरोप काही ग्रामस्थांनी केला आहे. तसेच पाणीटंचाईबाबत वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर ग्रामपंचायतीचा कारभार उघड होऊ नये म्हणून काही सदस्यांकडून नागरिकांनाच दमदाटी करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी गावकऱ्यांकडून होत आहे.

# मृगाची चाहूल; शेतकऱ्याला पावसाची प्रतीक्षा

## काहींनी धाडसाने केली पेरणी

प्रतिनिधी ८ जून

**योगेश मडावी**



**झरी जामणी :** आभाळात ढगांची हलकी गर्दी, शेतामध्ये तयार पडलेली जमीन आणि पावसाच्या एका सरीची आतुरतेने वाट पाहणारे डोळे... तालुक्यासह परिसरात ७ जूनपासून मृग नक्षत्राला सुरुवात झाली असून खरीप हंगामाची चाहूल लागली आहे. काही भागांत झालेल्या हलक्या पावसाने शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा एकदा पल्लवित केल्या आहेत.

पहिल्या पावसाच्या सरी कोसळताच अनेक शेतकऱ्यांनी बैलजोडी, ट्रॅक्टर आणि बियाण्यांसह शेताकडे धाव घेत पेरणीच्या कामाला सुरुवात केली. सोयाबीन, कापूस, तूर आदी पिकांच्या पेरण्या काही ठिकाणी सुरू झाल्या असून शेतात पुन्हा एकदा हालचाल वाढली आहे. मात्र, पावसाने अद्याप समाधानकारक हजेरी लावलेली नसल्याने अनेक शेतकरी संभ्रमात आहेत. "आता पेरणी केली आणि पाऊस थांबला तर बियाणे वाया जाईल," या चिंतेने काही शेतकरी अजूनही प्रतीक्षेची भूमिका घेत आहेत. शेत मशागतीची कामे पूर्ण करून अनेकांचे लक्ष आता केवळ आकाशाकडे लागले आहे.

गेल्या काही वर्षांत अवकाळी पाऊस, दुष्काळ आणि उत्पादन घट यांचा सामना केलेल्या शेतकऱ्यांसाठी यंदाचा खरीप हंगाम अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.त्यामुळे प्रत्येक ढग, प्रत्येक वाऱ्याची झुळूक आणि प्रत्येक पावसाचा थेंब त्यांच्यासाठी आशेचा किरण ठरत आहे.

हवामान विभागाने लवकरच मान्सून सक्रिय होण्याची शक्यता व्यक्त केली असून, समाधानकारक पाऊस झाल्यास खरीप हंगामाला वेग येणार आहे. सध्या मात्र झरी जामणी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मनात एकच प्रार्थना आहे "यंदा तरी पाऊस वेळेवर आणि भरभरून पडू दे...".

सिटी न्यूज अमरावती
सोमवार, दि. ८ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## नागरी सेवा परीक्षा २०२७ पूर्व प्रशिक्षणासाठी प्रवेश परीक्षा जाहीर

**अमरावती:** केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षा २०२७ च्या पूर्व प्रशिक्षणाकरिता अमरावती येथील 'भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र' (युपीएससी) यांच्यातर्फे विनामूल्य प्रशिक्षण देण्यासाठी प्रवेश परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. राज्यस्तरावरून ऑफलाइन पद्धतीने घेण्यात येणाऱ्या या प्रवेश परीक्षेसाठी पात्र आणि इच्छुक उमेदवारांकडून ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले आहे. सदर प्रशिक्षणाचा लाभ घेण्यासाठी जाहिरातीत नमूद केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक असून, या सुवर्णसंधीचा लाभ घेण्याचे आवाहन केंद्राच्या संचालिका डॉ. प्रतिभा भोरजार यांनी केले आहे. प्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकानुसार, ऑनलाइन अर्ज भरण्याचा कालावधी १ ते १७ जून २०२६ पर्यंत असणार आहे. तसेच परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम मुदत १९ जून २०२६ हा निश्चित करण्यात आला आहे.

# मेळघाटच्या प्रश्नावर बच्चू कडू आक्रमक; प्रशासनाला आंदोलनाचा इशारा

### ◆ गाव तिथे शाखा अभियानातून बच्चू कडूंचा थेट जनसंवाद; संघर्ष यात्रेतील आश्वासनांचा आढावा

प्रतिनिधी ८ जून

**अमरावती:** मेळघाटातील पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण, रोजगार, वनहक्क आणि रस्त्यांच्या प्रश्नांसाठी काढण्यात आलेल्या ऐतिहासिक मेळघाट संघर्ष महापदयात्रेनंतरही अनेक प्रश्न कायम असल्याचा आरोप करत आमदार बच्चू कडू यांनी पुन्हा एकदा प्रशासनावर हल्लाबोल चढवला आहे. शिवसेना पक्ष आणि प्रहार सामाजिक संघटनेच्या संयुक्त संपर्क अभियानांतर्गत शनिवारी त्यांनी धारणी व चिखलदरा तालुक्यातील विविध गावांचा दौरा करून नागरिकांशी थेट संवाद साधला.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या धारणी तालुक्यातील मोगर्दा आणि चिखलदरा तालुक्यातील गडगाभांडूम या गावांना भेट देत बच्चू कडू यांनी ग्रामस्थांचे अभिनंदन केले. यावेळी ग्रामस्थांनी त्यांचा सत्कार करत पाणीपुरवठा, वीज, आरोग्य सेवा, शिक्षण, रस्ते आणि रोजगाराशी संबंधित अनेक समस्या त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या.

या दौऱ्यादरम्यान विविध गावांतील अनेक नागरिकांनी शिवसेनेत प्रवेश केला. स्थानिक पातळीवर शिवसेनेचे संघटन अधिक मजबूत करण्यासोबतच जनतेचे प्रश्न थेट जाणून घेण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

शिवसेनेच्या 'गाव तिथे शाखा' अभियानांतर्गत बच्चू कडू यांनी मेळघाटात थेट जनसंपर्कावर भर दिला आहे. केवळ पक्षवाढ हा या अभियानाचा उद्देश नसून गावागावात जाऊन नागरिकांसोबत बैठका, चर्चासत्रे आणि संवाद



साधत स्थानिक प्रश्नांची तीव्रता समजून घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. मेळघाट संघर्ष यात्रेदरम्यान समोर आलेल्या प्रश्नांची सद्यस्थिती काय आहे, प्रशासनाने कोणती कामे पूर्ण केली, कोणते प्रश्न अद्याप प्रलंबित आहेत आणि नागरिकांच्या नव्या अडचणी कोणत्या आहेत, याची माहिती बच्चू कडू स्वतः गावकऱ्यांकडून घेत आहेत.

गडगाभांडूम येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना बच्चू कडू यांनी प्रशासनावर जोरदार टीका केली. ठमेळघाट संघर्ष यात्रेनंतर प्रशासनाला पुरेसा वेळ देण्यात आला. मात्र अनेक कामे आजही कागदावरच आहेत. अधिकारी बैठका घेतात, अहवाल पाठवतात; पण जनतेच्या आयुष्यात बदल घडविण्याची इच्छाशक्ती दिसत नाही. मेळघाटातील विकास रखडण्यास प्रशासनाची निष्क्रियता कारणीभूत आहे,ठ असा आरोप त्यांनी केला.यावेळी त्यांनी मेळघाटातील वीज प्रश्नावरही संताप व्यक्त केला. ठदेशाला स्वातंत्र्य मिळून अनेक दशके झाली, देश प्रगतीच्या नव्या उंचीवर पोहोचला; मात्र मेळघाटातील काही गावे आजही अंधारात आहेत. अनेक वस्त्यांपर्यंत नियमित वीज पोहोचलेली नाही. हा केवळ विकासाचा प्रश्न नाही तर प्रशासनाच्या अपयशाचा पुरावा आहे, असे ते म्हणाले.

बच्चू कडू यांनी स्पष्ट इशारा देत सांगितले की, संघर्ष यात्रेदरम्यान प्रशासनाला देण्यात आलेल्या सूचनांची तातडीने अंमलबजावणी झाली नाही, तर दिवाळीच्या काळात हजारो नागरिकांना सोबत घेऊन

**प्रशासनाला इशारा**
मेळघाटच्या प्रश्नांवर प्रशासनाने तातडीने निर्णय घेतला नाही, तर दिवाळीत हजारो नागरिकांसह जिल्हाधिकारी कार्यालयावर घेराव घालण्यात येईल. आता आश्वासनांचा नव्हे तर कृतीचा काळ आहे.
**- आ. बच्चु कडू**

अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य घेराव घालण्यात येईल. तसेच मेळघाटातील वीज प्रश्नावर स्वतंत्र आणि व्यापक जनआंदोलन उभारण्यात येणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले. मेळघाटच्या जनतेच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये. आता आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष कामे दिसली पाहिजेत. अन्यथा जनतेच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरून संघर्ष अधिक तीव्र केला जाईल, असा सज्जड इशारा त्यांनी प्रशासनाला दिला.

## श्री परमहंस परशराम महाराज महिमा ग्रंथाचा पारायण सोहळा

प्रतिनिधी ८ जून

**अमरावती :** श्री. परमहंस परशराम महाराज सेवाधारी परिवार, जळतापूर/पिंपळोद यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला श्री.परमहंस परशराम महाराज यांच्या महिमा ग्रंथांचा भव्य सामूहिक पारायण सोहळा रविवार, दि. ७ जून २०२६ रोजी श्रीक्षेत्र शेगाव येथे अत्यंत भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

श्री माहेश्वरी भवन, एसटी स्टँडसमोर, शेगाव येथे सकाळी ८.३० वाजता पारायणास प्रारंभ झाला. विविध जिल्ह्यांतून आलेल्या शेकडो भाविकांनी या ऐतिहासिक व धार्मिक सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून श्री परमहंस परशराम महाराजांच्या चरणी आपली श्रद्धा अर्पण केली. सामूहिक पारायणादरम्यान संपूर्ण




परिसर भक्तिरसाने भारावून गेला होता.

पारायणानंतर भाविकांनी महाराजांच्या महिमा ग्रंथातील उपदेश व विचारांचे चिंतन केले. त्यानंतर सर्व उपस्थित भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या प्रसंगी भाविकांमध्ये उत्साहाचे व आनंदाचे वातावरण पाहावयास मिळाले. या यशस्वी आयोजनासाठी जयंत सुरेशराव वानखडे (खामगाव/अमरावती), गोकुळभाऊ शेगोकर (आकोट), शंकरराव खवले (लोखोंडा), शरदराव देवरणकर(अध्यक्ष, शैव गुरव हितकारणी मंडळ, अमरावती), जयंत पुसदकर (अध्यक्ष, निळकंठेश्वर संस्था, अमरावती), भालचंद्रराव कथलकर (अंतरगाव गुरव), राजूभाऊ कथलकर, अशोकराव भारसाकळे, प्रशांतभाऊ देशमुख, परशरामभाऊ डोरस, पुरुषोत्तमराव खंडार, सुरेशराव रोहनकर, श्री कैलासराव डांगे, शुभमराव पुसतकर, ओमभाऊ मोरे, श्री मोहनराव पंडीत, दिपकराव राजनकर, संतोषराव दुत्तोंडे, श्री अशोक आगरकर, श्री चंद्रकांतराव पुसदकर, श्री दत्ताभाऊ कापसे, श्री सचिनराव चौधरी, श्री गणेशराव भांडे, श्री सचिनराव आरोकर, श्री संदीप राजूरकर, श्री हरिहरराव तांबस्कर, श्री प्रभाकर शेगोकर, श्री महेंद्रपाटील कथलकर, श्रीरामशंकर जयस्वाल, श्री दिलीपभाऊ बेलबागकर, श्री गोपालभाऊ चिखलकर, श्री मनोजराव तायडे, श्री राजूभाऊ पुसतकर, श्री दत्ताभाऊ शिंदे, श्री अनिल निहाटकर व श्री नारायणराव डांडगे, अजय राव वाघमारे जयेंद्रपाटील, बंडूपंत मोरे, सतीशराव पांडे, व इतर सर्व संस्थांवरील सेवेकरी यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व सेवाधारी, दानशूर भक्तण, ज्या समाज बांधवांनी व भक्तांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग दिला तसेच सर्व पत्रकार बंधूंचे सुद्धा त्यांनी महाराजांच्या कार्याचे प्रचार प्रसार मध्ये मोलाचा सहभाग दिला या सर्वांचे आभार आयोजक जयंत सुरेशराव वानखडे अमरावती यांनी मानले.

## ग्राहकांना अखंडित देण्यात महावितरण यशस्वी- सीएमडी लोकेश चंद्र

प्रतिनिधी ८ जून

**अमरावती :** महाराष्ट्रात या वर्षी विजेची उच्चांक मागणी नोंदविण्यात आली. महावितरणने ही मागणी विनाअडथळा पूर्ण केली. प्रभावी नियोजन, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेची परिणामकारक अंमलबजावणी, कृषी पंपाचे विक्रमी सौर उर्जीकरण तसेच नवीकरणीय ऊर्जेची मोठ्या प्रमाणात निर्मिती व वापर यामुळे महावितरणला विजेची वाढती मागणी पूर्ण करणे शक्य झाले. आगामी काळात विजेची वाढती मागणी तसेच शेतकऱ्यांसह सर्व वर्गवारीतील ग्राहकांना अखंडित व स्वस्त दरांत वीज पुरवठा करण्यास महावितरण पूर्णपणे सक्षम आहे,अशी ग्वाही महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र




यांनी दिली.

तसेच कंपनी शेअर बाजारात लिस्टिंग होणार असल्याने महावितरणला आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनीच मिशन मोड वर काम करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. महावितरण कंपनीचा २१ वा वर्धापन दिन महावितरणचे मुख्यालय प्रकाशगड मुंबई येथे उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लोकेश चंद्र बोलत होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून म.रा.वीज मंडल सूत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक तसेच महावितरणचे संचालक(संचालन तथा प्रकल्प) सचिन तालेवार, संचालक (वित्त ) अनुदीप दिघे, संचालक (वाणिज्य) योगेश गडकरी ,संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार हे प्रामुख्याने उपस्थित होते.

## युवासेना जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न

### ◆ आयोजक युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर, युवासेना जिल्हाप्रमुख उमेश शहाणे

प्रतिनिधी ८ जून

**दर्यापूर :** स्वाभिमान, धैर्य आणि जनसेवा यांचा संदेश देणारे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे आणि युवासेना प्रमुख आदित्य साहेब ठाकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अमरावती जिल्ह्यातील तरुण वक्त्यांना आणि विद्यार्थ्यांच्या विचारांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी युवासेना अमरावती जिल्ह्याच्या वतीने भव्य जिल्हास्तरीय ठसडेतोड वक्तृत्व स्पर्धा - २०२६ठ चे आयोजन करण्यात आले होते. ठयुवकांचे विचार... महाराष्ट्र घडवणार!ठ हा मुख्य गाभा असलेल्या या स्पर्धेत जिल्ह्यातील एकूण १८ स्पर्धकांनी उस्फूर्तपणे भाग घेत आपल्या सडेतोड विचारांनी आणि वक्तृत्वाने उपस्थितांची मने जिंकली. युवासेना प्रमुख आदित्यसाहेब ठाकरे आणि युवासेना शिवसेना सचिव आमदार वरुणजी सरदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश




पाटील कावडकर आणि युवासेना जिल्हाप्रमुख उमेश शहाणे यांच्या धडाडीच्या नेतृत्वात शिवसेना जनसंपर्क कार्यालय, बस स्टँड रोड अमरावती येथे ही स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. तरुणाईच्या बौद्धिक आणि वैचारिक पातळीला आव्हान देण्यासाठी या स्पर्धेत 'व्हिजन महाराष्ट्र २०५०' आणि 'राजकारण आणि समाजकारण युवकांची भूमिका' हे दोन विषय ठेवण्यात आले होते. या स्पर्धेचे अचूक व निष्पक्ष परीक्षक म्हणून शिवसेना माजी जिल्हाप्रमुख प्रदीप बाजड, ज्येष्ठ शिवसैनिक नितीन तारेकर, महिला आघाडी सहसंपर्कप्रमुख प्रतिभाताई बोपशेट्टी यांनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना उपनेते तथा अमरावती जिल्हा संपर्कप्रमुख सुधीर सूर्यवंशी प्रामुख्याने उपस्थित होते. आजच्या युवकांना देशातील चालू असलेल्या परिस्थितीची आणि सामाजिक-राजकीय घडामोडींची जाण असणे अत्यंत आवश्यक आहे, आणि तो हक्काचा मंच आज युवासेनेच्या माध्यमातून तरुण-तरुणींना उपलब्ध होत आहे, अशा शब्दांत मान्यवरांनी आयोजकांचे कौतुक केले. वक्तृत्व क्षेत्रातील नवोदितांना प्रोत्साहन देण्यासाठी पूर्णपणे विनामूल्य ठेवण्यात आलेल्या या स्पर्धेत अत्यंत चुरस पाहायला मिळाली, ज्यामध्ये विजेत्या स्पर्धकांची नावे खालीलप्रमाणे आहेत: प्रथम क्रमांक- आलोक दामोदर दुसरा क्रमांक-रोहन चिचखेडे तिसरा क्रमांक- कु फाल्गुनी कोल्हे विशेष म्हणजे, स्पर्धेत सहभाग नोंदवणाऱ्या प्रत्येक वक्त्याला सहभाग प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. हा भव्य कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युवासेना जिल्हा प्रमुख अंकुश पाटील कावडकर, युवासेना जिल्हाप्रमुख उमेश शहाणे, युवतीसेना विभागिय सचिव पियूशिका मोरे, युवासेना जिल्हा चिटणीस चेतन जवंजाळ, सागर गिरहे, दीपक बगाडे, योगेन सोळंके, प्रज्वल देशमुख, शुभम पाटील, हर्ष धोटे, मोहन खळबळकार, योगेश कावडकर, संतोष रौराळे, तसेच जिल्ह्यातील इतर अनेक युवासैनिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तरुणाईच्या वैचारिक प्रवासाला अचूक दिशा देणाऱ्या या यशस्वी आयोजनाबद्दल संपूर्ण जिल्ह्यात युवासेना चे कौतुक होत आहे.

## महाराष्ट्र पोलीस, मेरा युवा भारत जिल्हा क्रिडा व अमरावती सायकलिंग असोसिएशन तर्फे "Sunday on Cycle" सायकल रॅली उत्साहात

प्रतिनिधी ८ जून

**अमरावती:** पमहासंचालक, खेलो इंडिया, भारतीय खेल प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या पत्रानुसार ठएर्ल्द्बि् दह एब्म्तठ या उपक्रमाचे आयोजन महाराष्ट्र पोलीस, मेरा युवा भारत, जिल्हा क्रीडा कार्यालय, अमरावती तसेच अमरावती सायकलिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. ०७ जून २०२६ रोजी करण्यात आले. सदर सायकल रॅलीची सुरुवात सकाळी ०७.०० वाजता जिल्हा स्टेडियम, अमरावती येथून करण्यात आली. रॅलीचा मार्ग जिल्हा स्टेडियम डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक राजकमल चौक गर्ल्स हायस्कूल चौक जोग स्टेडियम असा होता. रॅलीची सांगता पोलीस मुख्यालय, जोग स्टेडीयम, अमरावती ग्रामीण येथे करण्यात आली.

या उपक्रमामध्ये सुमारे २५०



ते ३०० विद्यार्थी, विविध समाजसेवी संस्थांचे सदस्य, नागरिक, पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सायकलिंगच्या माध्यमातून आरोग्यदायी जीवनशैली, पर्यावरण संरक्षण आणि शारीरिक तंदुरुस्तीचा संदेश देण्यात आला. यावेळी उपस्थितांना नियमित व्यायाम, सायकलिंग व पर्यावरणपूरक वाहतुकीचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले. 'फिट रहा हिट रहाठ, 'सायकल चालवा, आरोग्य कमवा, पर्यावरण वाचवाठ हा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला.

रॅलीच्या समारोप कार्यक्रमात अमरावती ग्रामीणच्या पोलीस बँड पथकाने आपल्या आकर्षक वादनाने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली समारोप कार्यक्रम उत्साहात पार पडला.

यावेळी उपायुक्त श्री. नरेंद्र वानखडे (महानगरपालिका, अमरावती), निवासी उपजिल्हाधिकारी काकडे, अजिंक्य गवळी (लेखाधिकारी, मेरा युवा भारत), अमरावती सायकलिंग असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी, सचिव श्री. अतुल कळमकर तसेच डॉ. प्रकाश मेश्राम, शिक्षणाधिकारी, मनपा अमरावती हे प्रमुख मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांचा गुलाबपुष्प व 'ग्रामगीता' पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. तसेच रॅलीमध्ये सहभागी झालेल्या सर्व सायकलपटूंना चहापाण्याची व्यवस्था करण्यात आली.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राखीव पोलीस निरीक्षक तसेच त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी व अंमलदार यांनी उत्कृष्ट नियोजन व समन्वय साधून मोलाचे योगदान दिले. कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवर, सहभागी नागरिक, विद्यार्थी आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

## विदर्भात मान्सून १५ जून नंतर दाखल होणार

### हवामान तज्ञ प्रा. अनिल बंड यांचा अंदाज

प्रतिनिधी ८ जून

**अमरावती :** मानसुन दक्षिण महाराष्ट्र (सिंधुदुर्ग) चेन्नई पर्यंत पोहोचला आहे. पुढील ३/४ दिवसात तो महाराष्ट्र, तेलंगणा आंध्रच्या काही भागात, पोहोचण्याची शक्यता आहे.

विदर्भात कधी पोहोचेल हे सध्या सांगता येत नाही.तरी सुद्धा १५ तारखेनंतरच पोहोचेल अशी आशा आहे. असा अंदाज हवामान तज्ञ प्राध्यापक अनिल बंड यांनी व्यक्त केला आहे.

८ ते १४ जुन विदर्भात तुरळक ठिकाणी हलक्या मध्यम पावसाची, थंडरस्ट्रॉर्म शक्यता. कोंकण किनारपट्टीवर हवेच्या वरच्या भागात चक्राकार वारे वाहत आहेत. त्यांचे रूपांतर कमी दाबाचे क्षेत्रामध्ये होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मानसुनचे आगमन लवकर किंवा उशिरा होऊ शकते. १० तारखेनंतर परिस्थिती स्पष्ट होईल. असा अंदाज प्रा अनिल म. बंड अमरावती यांनी वक्त केला.

## नांदेड बु. येथे अत्याधुनिक कामधेनु गोशाळेचे उद्घाटन

प्रतिनिधी ८ जून

**दर्यापूर :** तालुक्यातील नांदेड बु. येथे कै. सुधाकर बाबनजी भोंगळे शैक्षणिक व बहुउद्देशीय संस्था नाशिक अंतर्गत उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक कामधेनु गोशाळेचे उद्घाटन छत्रपती शिवाजी महाराज,डॉ . बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसुर्य ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमा पूजन करून प्रसिद्ध ॲड. श्री.मनीष शिरसाट यांच्या हस्ते फित कापून तथा गायींचे पूजन व नैवेद्य अर्पण करून उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. गोसंवर्धन, निराधार व भटक्या गोमातांचे संरक्षण तसेच सामाजिक बांधिलकी जपणारा हा प्रकल्प परिसरासाठी प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना यावेळी आपल्या भाषणातून कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रसिद्ध ॲड.मा.



श्री. मनीष शिरसाट यांनी व्यक्त करून गोसंवर्धन ही काळाची गरज असून अशा सेवाभावी उपक्रमांना समाजाने सहकार्य करण्याचे आवाहन केले.

ही गोशाळा केवळ गोमातांच्या संगोपना पुरती मर्यादित नसून सामाजिक, सेवाभावी व पशुसंवर्धन क्षेत्रात एक आदर्श प्रकल्प म्हणून विकसित करण्याचा संस्थेचा मानस असल्याचे यावेळी सांगण्यात आले. भविष्यात आधुनिक सुविधा, गोपालन व्यवस्थापन व मुक्त गाय गोठा संकल्पनेद्वारे या प्रकल्पाचा विस्तार करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. गोदान देणारे सुबोध भोंडे, अतुल भोंडे, विठ्ठलराव तेलमोरे, यांना गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमास प्रशासक सरपंच, उपसरपंच राजेंद्र भोंगळे, प्रतिष्ठित नागरिक भारत भाऊ भोंगळे, नानाभाऊ इंगळे , दिलीपराव रुपनारायण, दिलीपराव इंगळे, जगदेवराव इंगळे, रामभाऊ भोंगळे, रामदास भोंगळे, मिलिंद भोंगळे, आशिष भोंगळे, अनिकेत वाकपांजर,प्रा. होले,राहुल हाडोळे, चेतन इंगळे, जयकुमार चक्रे, राहुल इंगळे, कैलास रुपनारायण, अरुणराव वाघमारे,प्रदीप रुपनारायण, साजिद शेख, शुद्धोधन मोहोड, रवि भोंगळे, संदीप रुपनारायण, सादिक भाई, शिवदास भोंगळे, ॲड. वडुळकर, राजू लांबे, मनोज बावनेर, विजय भोंगळे, अनिल नेहर, चंद्रकांत गावंडे, श्रेयश भोंगळे, राहुल शिरसाट, विनोद इंगळे, रामभाऊ दामले,नंदू राठी, प्रशांत गवई, सुरेश डवरे, दिलीप वाकपांजर, सुगत भोंगळे, सुशांत राऊत, विकी चक्रे, बिट्टू पठाण तथा विविध क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते, युवक मान्यवर, ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते, गोप्रेमी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कामधेनु गोशाळेचे सचिव सिद्धार्थ भोंगळे यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन संस्थेचे पदाधिकारी, सदस्य व स्वयंसेवकांनी केले.

या उपक्रमामुळे परिसरात समाधान, उत्साह व सामाजिक अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून गोसंवर्धन चळवळीला नवीन दिशा मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

सोमवार दि ८ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

























# राजकीय, अध्यात्मीक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील अजातशत्रु व्यक्तिमत्व

## विद्यावाचस्पती प्रा. दिलीप जोशी सर

वाशीममधील अष्टपैलू व्यक्तिमत्व आदरणीय प्रा.दिलीप जोशी सर यांचा वाढदिवस.त्यांना उदंड आयुष्याच्या खूप खूप शुभेच्छा !वाशिममध्ये दिलीप जोशी एकमेव व्यक्तिमत्त्व आहे जे सामाजिक ,धार्मिक,शैक्षणिक ,अध्यात्मिक आणि राजकीय क्षेत्रात अधिकारवाणीने कार्यरत आहे.माझा संबंध आल्यापासून त्यांना मी मार्गदर्शक म्हणून स्विकारले आहे.प्रश्न कोणताही असो त्याचे उत्तर जोशीसरच आहे.माझ्या जीवनात मोठमोठ्या लोकांशी संबंध आला पण इतका स्पष्टवक्ता ,रोखठोक ,निर्भिड आणि निस्वार्थी माणूस मी पाहिलाच नाही.जोशिसर लहानपणापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक .संघ,विहिंपच्या विविध जवाबदाऱ्या त्यांनी सांभाळल्या.सद्य स्थितित शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या विद्या भारतीचे ते वाशिम जिल्हाध्यक्ष आहेत.अयोध्या आंदोलनात वाशिम जिल्ह्याचे नेतृत्व त्यांच्याकडेच होते.दोन्ही कारसेवेत ते स्वतः हजर होते.संघ शिक्षा वर्ग नांदुरा येथे ते मुख्यशिक्षक होते तर अनेक वर्ष संघाच्या तृतीय वर्षाला ते शिक्षक आणि वाहिनी प्रमुख होते.विहिंप चे ते विदर्भ प्रांत सह धर्माचार्य प्रमुख असतांना अनेक साधूसंतमहंतांना त्यानी विहिंपशी जोडले.बजरंगदल आणि दुर्गा वाहिनीच्या शौर्य प्रशिक्षण वर्गात ते बौद्धिक प्रमुख म्हणूनही त्यानी जवाबदारी पार पाडली.वाशिम येथील श्री.छत्रपती शिवाजी ज्ञानपीठ येथे ते प्राचार्य पदी कार्यरत आहेत.वाशिमच्या सुप्रसिद्ध टिळक स्मारक भवन ट्रस्ट चे ते कार्यवाह आहेत.लोकमान्य टिळकांनी स्थापन केलेल्या राष्ट्रीय गणेशोत्सव मंडळाचे ते सचिव असून १०५ वर्षांची परंपरा असलेल्या या मंडळाची व्याख्यानमाला टिकवून ठेवण्याचे श्रेय श्री.जोशी सरांनाच जाते.श्रीमाता अमृतानंदमयी सत्संग समितीचे ते सचिव असून वाशिममधील सर्वाधिक साधक आणि उपक्रम राबविणारी ही सत्संग समिती आहे.या समितीचे अध्यात्मिक कार्य जोमात चालते त्यात सिंहाचा वाटा श्री .दिलीपजी जोशी यांचाच.मीही या समितीशी जोडल्या गेलो आहे. ज्ञानेश्वरी, गाथा,श्रीसुक्त,गणपती अथर्वशीर्ष, रामायण, रघुवंश, गुरुचरित्र अशा विविध विषयावरची प्रवचने मी स्वतः ऐकली आहेत.त्यांच्या जिभेवर अक्षराशः सरस्वतीचा निवास आहे. सूत्रसंचालन करतांना शब्दांचा वर्षाव सर्वांना मंत्रमुग्ध करुन जातो. केरळच्या सुप्रसिद्ध संत माता अमृतानंदमयी,माजी उपपंतप्रधान श्री. लालकृष्ण अडवाणी, सरसंघचालक मोहनजी भागवत, स्व. प्रमोदजी महाजन ,स्व.गोपिनाथजी मुंडे,माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी सर अशा बड्या नेत्यांचे सूत्रसंचालन आजही मनावर कोरुन आहे.



विशेषता सरसंघचालक मोहनजी भागवत यांच्या कार्यक्रमाचे नियोजन तथा सुत्रसंचालन वाखाणण्याजोगे होते. त्यांचे लिखाण देखिल नामवंत वृत्तपत्रे ,साप्ताहिके आणि मासिकातून नित्याने प्रसिद्ध होतात. एखाद्या व्यक्तिचे व्यक्तिचित्रण,गुणगौरव लिहावा तो प्रा.दिलीप जोशी यांनी.दुसऱ्याची स्तुती करणे सोपे नसते पण जोशी सर दुसऱ्याबद्दल इतके भरभरून लिहितात की त्यांचे मन किती मोठे असेल याची कल्पना येते. नवीन शैक्षणिक धोरणासंदर्भात दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि स्मृती ईराणी यांच्या उपस्थितीत झालेल्या चर्चासत्राला उपस्थितीचे सद्भाग्यही त्यांना लाभले. वत्सगुल्म महात्म्यावर त्यांचा गाढा अभ्यास.वाशिमचे नाव वत्सगुल्म वाशिम व्हावे यासाठी त्यांचा प्रयत्न किंवा विद्यापीठाचे उपकेंद्र वाशिमला व्हावे यासाठीचा पुढाकार सर्वश्रुत आहे.

श्री.जोशी सरांची जनजागरण मंच नावाची रोखठोक टीम आहे. लोकप्रतिनिधींना बोलावून ते त्यांना रोखठोक प्रश्न विचारतात.आजवर अनेक राजकारण्यांना रथी महारथींना न.प. अध्यक्ष पदाच्या उमेदवारांना रोखठोक मंचावर पाचारण करुन त्यांना घाम फोडला आहे.वाशिमच्या निवडणुकीत जोशी सरांची भूमिका नेहमीच परिणामकारक ठरते.म्हणूनच किंगमेकर ही उपाधी त्यांना सहज मिळाली आहे.सर मान्य करणार नाहीत पण वाशिममधिल राजकारणातले पडद्यामागचे सूत्रधार दिलीपसरच आहेत. आ.लखन मलिक साहेबांच्या विधानसभेचा त्यांचा अंदाज इतका अचूक असते की दोनाचार मताचाच फरक दिसतो.तो आधीच फेसबुक वर टाकल्या जातो.अख्खा मतदारसंघ साक्षीदार आहे. वाशिम मधील प्रत्येक विधायक कार्यात श्री.दिलीप जोशी सरांचा सहभाग असतो.आता लव्ह जिहाद विरोधी मोर्च्याच्या वेळी त्यांनी अपार मेहनत घेतली होती.हा मोर्चा न भूतो न भविष्यती ठरला.याशिवाय त्यांनी शासनाच्या दूरसंचार सदस्य आणि वृद्ध कलावंत मानधन समितीवर लक्षणीय कार्य केले. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून शून्यातून स्वर्ग निर्माण करणारे जोशी सर.कुठलेही सामाजिक ,राजकीय किंवा आर्थिक पाठबळ नसतांना देखील वाशिममध्ये त्यांनी काबाडकष्ट,मेहनत,अभ्यास आणि बुद्धी मुळे पहिल्या नवरत्नात स्थान मिळविले.खा.भावनाताई गवळी यांचे ते निकटवर्तीय समजले जातात.वाशिममध्ये ना.नितीनजी गडकरी यांच्या उपस्थिती मिहानचा पंचवीस हजार विद्यार्थ्यांचा मेळावा,माता अमृतानंदमयी यांच्या उपस्थितीत एक लाख लोकांचा सत्संग,सरसंघचालक मोहनजी भागवत यांच्या उपस्थितीत प्रचंड संख्येत आद्य शंकराचार्य जयंती,रामेश्वर महाराजांचे योगशिबिर ,दरवर्षी सहा जुनला होणारा योगदिवस,सर्वांगसुंदर दिवाळी पहाट अशा असंख्य कार्यक्रमात दिलीपसरांचा मोलाचा सहभाग.त्यांच्या संस्कार साधना शिबिराला तर प्रचंड प्रतिसाद असतो. त्यांच्याद्वारे आयोजित मंत्रसाधना शिबिराला तर प्रशासनातील अधिकारी ,पोलीसकर्मी ,युवक युवती मोठ्या संख्येंने हजेरी लावतात.त्यांचे सर्वांशीच जातपात ,धर्म आणि पक्ष यांच्याशी आपुलकीचे नाते आहे.राजकीय प्रतिनिधींना रोखठोक बोलणारे हे वाशिम मधील निर्भीड नितीमत्ता व समाधानी असणारे आदर्श व्यक्तीमत्व.तसेच त्यांच्या बोलण्याचा किंवा सल्ल्याचा कोणीच अनादर करीत नाही. त्यांची ताकद त्यांचा निरपेक्ष भाव आहे. ते ज्या ज्या ठिकाणी काम करतात त्यांना ना पदाची, ना पैशाची ना मानपानाची अपेक्षा.

धनानंदाच्या सत्ता उलथवून टाकणारे इतिहासातील चाणक्य प्रत्यक्षात पाहायचे असतील तर जोशीसरांकडे पाहा.श्री.दिलीप जोशी हे वाशिम मधिल असे व्यक्तिमत्त्व आहे की ज्यांच्याशिवाय वाशिमला पूर्णत्व येणारच नाही.अशा वाशिमच्या भूमिपुत्राचा आज वाढदिवस आहे.त्यांना दीर्घायुष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना !















# वाशीमला लाभलेले एक बहुगुणी, बहुआयामी, रोखठोख व्यक्तिमत्व!

## अमृतस्य पुत्रः श्री. दिलीप जोशी

सरांचे आणि माझे १९८५ पासूनचे संबंध. आम्ही दोघेही आर.ए .कॉलेज चे विद्यार्थी.सर मला एक वर्षांनी जूनियर .कॉलेजच्या दिवसांपासून मी सरांना जे पाहत आलो तेंव्हापासून कमालीच धाडस आणि अमोघ वाणी घेऊन आजपर्यंतचा आणि यापुढेही जीवनप्रवास करणारा हा मुसाफिर .प्रचंड संवेग , अणोखी कार्यशैली ...कॉलेजमधे सुध्दा एलेक्शन , वादविवाद , परिसंवाद यामध्ये नेहमी सरांचाच प्रभाव जास्त.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या आखाड्यात कसलेल हें शरीर आणि मन आयुष्यात आलेल्या कितीतरी कठीण प्रसंगांना धीराने , खंबीरपणे तोंड देत राहिले. अतीशय गरीब परिस्थिती , त्यात स्वबळावर स्वतःच शिक्षण घेऊन स्वतःच्या व्यक्तिमत्वाला आणि आयुष्याला एक वेगळा आकार दिला.

असे कितीतरी लोकं आहेत शिक्षक असतील , नव्याने कारकीर्द सुरु करणारे असतील , कोणाचे approvals अडलेले असतील किंवा कोणाची बदली असेल काहीही काम असलं तरी त्यांच्याकडे आलेले लोकं अगदी आनंदी , समाधानी होऊनच परततील. एकदा कोणाशी नातं जुळल की ते शेवटपर्यन्त कायम टिकवतात. आपल्या मित्रांच्या सुखाच्या प्रसंगात तर असतातच पण दुःखाच्या प्रसंगी बोलावण्याची वाट न पाहता रात्री बेरात्री धावत जातील . कुठलीही मदत करायला तत्पर असतील .हे मी माझ्या अनुभवाने सांगतो आहे. माझ्या दवाखान्याच्या कठीण प्रसंगी सर पूर्ण वेळ माझ्यासोबत होते . वेळप्रसंगी त्यांना मी हळव झालेलं पाहिलं आणि तितक्याच ताकदीने रोखठोखसारख्या कार्यक्रमात आक्रमक होतांना पाहिलं आहे. आजही वाशीमकरांना रोखठोख कार्यक्रमाची भव्यता आठवते . त्यांच्यासोबत राहताना आपण एका विशाल वृक्षासोबत राहतो याची अनुभूती तर नेहमीच येते पण आपले असामान्यपण किंवा विद्वत्तेने ते समोरच्याला दिपवून न टाकता उलट त्यांना आपलेसे करतात.

असंख्य सभा , कितीतरी विषय अगदी पोटतिडकिनें लोकांसमोर आणले.समोर जितका प्रचंड जनसमुदाय असला तितकं त्यांचं वक्तृत्व अजुन बहरून येतं .मग विषय कुठलाही असों , सामाजिक धार्मिक , अध्यात्मीक , शैक्षणिक इत्यादी विषयात सरांचा हातखंडा .वेगळ्या पद्धतीने मांडण्याची वेगळी शैली.श्रीगणेशाने दिलेली चाणाक्ष बुद्धिमत्ता आणि जिभेवर साक्षात सरस्वतीचा वास त्यामुळे ज्ञानेश्वरी असों की समर्थ असों ...समोरच्या श्रोत्यांना मन्त्रमुग्ध करणं हें त्यांनाच जमतं.ज्ञानेश्वरी हा मुळातच प्रासादिक ग्रंथ पण सर ज्यावेळी ह्या विषयांवर बोलतात तो तर ' कल्पतरूवरी फुलोराच ! वाशीमला अम्मा म्हणजे माता अमृतानंदमयी यांचा पद्स्पर्श झाला त्या कार्यक्रमामध्ये सरांचा सिंहाचा वाटा.प्रचंड जनसमुदाय लोटलेला पण तो जनसमुदाय खिळवून ठेवला सरांनी. अमृता सत्संग समिती स्थापन झाली ही समिती नाही तर हा एक परिवार आहें , अमृता सत्संग परिवार ....ह्या परिवाराचे सर मुखंड, वेळ पडला तर सतरंज्या उचलायला सुद्धा मागे नसतात .प्रत्येक सदस्याकडे जातीने लक्ष ठेवणारे , काळजी घेणारे .अतीशय वक्तशीर ....सकाळी सहाला साधना सुरु होणारच मग कोणी असल नसल तरी ते सुरु करणार. सामूहिक साधनेमध्ये किती ताकद असते ते त्यांनीच आम्हाला शिकविलं. सरसंघचालक प.पू.मोहनजी भागवत यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री शंकराचार्य जयंतीचं आयोजन अमृता सत्संग समितीने केलं .त्यावेळेला त्यांच्यातील प्रचंड ऊर्जास्रोत , जबरदस्त नियोजन , अडथळ्यावर मात करुन जिंकण्याचा दुर्दम्य विश्वास हे सगळे गुण पुन्हा नव्याने समोर आले आणि न भूतो न भविष्यति असा आणि वाशीमकरांना भूषण वाटावा असा चिरस्मरणीय कार्यक्रम अडथळ्यातूनही पार पाडला. सर हाडाचे शिक्षक आहेत . विद्यार्थ्यांना हवेहवेसे वाटणारे , एक यशस्वी मुख्याध्यापक .सर मुख्याध्यापक नसते तर कदाचित आज श्री छत्रपती शिवाजी ज्ञानपीठ अस्तित्वातच नसतं .कुठल्याही परिस्थितीत , कुठल्याही प्रसंगात आपल्या माणसांची साथ न सोडण्याची वृत्ती .हे करत असतांना इतर कितीतरी शिक्षकांचे प्रश्न ते सोडवतात हे मी स्वतः पाहतो .मग ते कितीही गुंतागुंतीचे असो ते मार्गी लावणारच सरांचे आणि माझे मैत्र ..आणि आता आमचे दोन परिवार अद्वैत . एकमेकांचे सुखदुःख , चर्चा , बैठका प्रचंड आनंददायी असतं सगळं शिस्तप्रिय पण मृदू आणि मातृहृदयी आणि वेळ पडली तर समोरच्याला शब्दशस्त्राने कसं नामोहरम करायचं हे कसब त्यांचच. राजकारण , समाजकारण , अध्यात्म , परिवार ह्या सगळ्यांना सोबत घेऊन चालणारं हे अष्टावधानी व्यक्तिमत्व .कितीतरी वादळाना , संकटांना न जुमानता स्वतःच्या बळावर मोठ्ठं झालेलं कणखर व्यक्तिमत्व . संघ , पक्ष , शिक्षकांच्या समस्या , समाजकार्य ह्या सर्वांसोबत त्यांनी त्यांचा परिवारसुद्धा जोडून ठेवला आहे. पारिवारिक कार्याला तेवढच प्राधान्य देतात .अशा आमच्या मित्राचं जीवन म्हणजे सतीच वाण ! त्यांच्या सोबत संसार म्हणजे सोपा नाही . त्यांना आयुष्याची जोडीदार म्हणून आमच्या सौ.दीपाली वहिनींचा कस लागतो पण त्याच सांभाळू जाणे ! असे माझे अद्वैत ज्ञानदेवांनी सांगितल्याप्रमाणे ते वाट कृपेची करीतु, ते दिशा स्नेहेचि भरीतु जीवातळी आंथरितु, आपुला जीव! असेच आहेत !

वयं अमृतस्य पुत्रः म्हणत पत्थरालाही छेदून उगवणाऱ्या पिंपळवृक्षासारख्या वत्सगुल्मभूषण असलेले माझे जिवलग आदरणीय श्री दिलीप सरांना आजच्या सुंदर वाढदिवसानिमित्त आरोग्य , सुयश लाभो हीच प्रार्थना ...

**जीवेत शरदः शतम सर !**

**प्रा. मनोज सुतवणे**
उपप्राचार्य , द वर्ल्ड स्कूल वाशीम .
८३२९२२६४९५

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
सोमवार, दि. ८ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त खामगाव वनपरिक्षेत्रात वृक्षारोपण

**खामगाव :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त खामगाव वनपरिक्षेत्रामध्ये विविध ठिकाणी वृक्षारोपण व पर्यावरण जनजागृतीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. हा उपक्रम जमीर शेख उपवनसंरक्षक वन विभाग बुलढाणा, व्ही. एम. काकडे, सहायक वनसंरक्षक बुलढाणा तसेच स्वप्नील पवार, वनपरिक्षेत्र अधिकारी खामगाव यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. वनपाल सातव, सोनुने, नागरे, खेडकर व शिंदे यांनी खामगाव शहर, जनुना, गणेशपूर, गेरू माटरगाव, श्रीधरनगर, हिवरखेड व लाखणवाडा येथे वन समित्यांच्या सहकार्याने वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित केले.

यावेळी सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थ व वन विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान शेतकऱ्यांना पर्यावरण संवर्धन, वन्यजीव संरक्षण तसेच मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी घ्यावयाच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विशेषतः रात्रीच्या वेळी शेतात जाताना वन्यप्राण्यांपासून करण्यासाठी बचाव आवश्यक खबरदारीची माहिती देण्यात आली.

# जि.प. शाळेत विद्यार्थ्यांची पटसंख्या, गुणवत्ता वाढीच्या मोहिमेचा शुभारंभ

**◆प्रभातफेरी काढून केला जागर ◆जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेशासाठी 'वासुदेवाची' साद**

प्रतिनिधी ८ जून

**खामगाव:** जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या आणि बाढीसाठी जिल्ह्यात विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून खामगाव तालुक्यातील बनवाडा येथे येथे एका अने प्रवेशोत्सवाची सुरुवात करण्या आली. यावेळी उपक्रमशील शिक्षक राजेश बोगदे यांनी चक्क अख्या 'वासुदेवा'चे रूप धारण करून माध्यमातून केले. पटसंखा व गुणवत्ता वाढीसाठी विशेष उपक्रम घरोघरी जात, पालकांना आपल्या जिल्हा परिषद शाळेत दाखल करण्याचे भावनिक आगि प्रधानी आवाहन गायनाच्या





घेत लाखस्नवाडा गावातून प्रभातफेरी काढून इन इन जनजागृती ज जनजाती करण्यात करण्यात आली. आली. राज्याचे शिक्षण मंत्री यांनी २ जून रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि आढावा बैठक घेतली होती. या बैठकीत जिल्हा परिषद शाळांच्या गुणवत्ता व पटसंख्या वाढीसाठी महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या होत्या, या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी बुलडाणा जिल्ह्यात सुरू झाली असून, लाखनवाडा गावातील हा उपक्रम या मोहिमेचा जिल्ह्यात पहिला टप्पा ठरला आहे.या अनेख्यण मोहिमेदरम्यान शिक्षण विभागाच्या वतीने सर्व शाळांच्या गुणवत्तेबर १०० विश्वास ठेवण्याची विनंती करण्यात पाठक, ग्रामस्थ डोकळतिनिधींना जिल्हा परिषद आली आहे. शाळेत प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांच्या प्रगतीची शशस्वती विभागाकडून गटशिक्षणाधिकारी गजानन गायकवाड यांनी दिली. या कार्यक्रमासाठी लाखनवाडा येथील जिल्हा परिषद मराठी, उर्दू हायस्कूल च्या मुख्याध्यापक, शिक्षक शाळा व्यवस्थापन समिति यांनी परिश्रम घेतले.

पालकांनी पाल्यांचा प्रवेश निश्चित करावा
बुलडाणा जिल्ह्यातील जिल्हा परिषद शालांच्या विद्याव्यांनी नुकतेच एन.एम. एम. एस. परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. लोय, नवोदय विद्यालयासाठी निवड इवलेल्या ८० पैकी तब्बल ३८ विद्यार्थी हे जिल्हा परिषद शाळांमधील आहेत, ही जिल्ह्यासाठी आणि शिक्षग व्यवस्थेसाठी अत्यंत अभिमानाची बाब असून शिक्षक घरोघरी येऊन प्रवेशासाठी जे अथक प्रयास करत आहेत, त्यांच्या चा प्रयत्नांना दाद देत पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश जिल्हा परिषद शाळेतच निश्चित

**विकास पाटील,**
शिक्षणाधिकारी प्राणिक

## शिवानी बनावट हत्याकांड प्रकरणात मोठी कारवाई पोलिस निरीक्षक अंबुलकर, नितीन पाटील निलंबित

प्रतिनिधी ८ जून

**जळगाव जामोद:** महाराष्ट्रभर गाजलेल्या शिवानी कलमेकर बनावट हत्याकांड प्रकरणात अखेर पोलिसांच्या तपास पध्दतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी मोठी प्रशासकीय कारवाई करण्यात आली आहे. सदोष व हलगर्जी तपासाचा ठपका ठेवत बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर आणि जळगाव जामोद पोलीस स्टेशनचे तत्कालीन ठाणेदार नितीन पाटील यांना ७ जून रोजी निलंबित करण्यात आले आहे.

राज्यभर चर्चेत आलेल्या या प्रकरणात शिवानी कलमेकर हिची हत्या झाल्याचा समज करून तपास सुरू करण्यात आला होता. मात्र पुढे संपूर्ण कथानकाला धक्कादायक वळण मिळाले आणि कथित हत्येचा दावा खोटा असल्याचे समोर आले. या प्रकरणात मध्यप्रदेशातील बापुराम कलमेकर व त्यांचा मुलगा अजय कलमेकर या पिता-पुत्रांना संशयित मानून तब्बल २२ दिवस तुरुंगात ठेवण्यात आले होते. नंतर तपासातील गंभीर त्रुटी उघड झाल्यानंतर पोलिसांच्या भूमिकेवर

तीव्र टीका झाली. या पार्श्वभूमीवर दोन पोलीस निरीक्षकांवर निलंबनाची कारवाई झाली असली, तरी तपासादरम्यान मार्गदर्शन करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जबाबदारीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. सुरुवातीपासूनतपासावर वरिष्ठांचे मार्गदर्शन असल्याचे पोलीस विभागाकडून वेळोवेळी सांगितले जात होते. त्यामुळे केवळ तपास पथकातील दोन अधिकाऱ्यांवर कारवाई करून प्रकरण संपणार का? असा प्रश्न जनमानसात उपस्थित होत आहे. दरम्यान, या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता पोलीस महासंचालकांच्या बुलढाणा दौऱ्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या दौऱ्यानंतर तपास प्रक्रियेत

सहभागी असलेल्या इतर अधिकाऱ्यांच्या भूमिकेचेही परीक्षण होणार का, तसेच आणखी कारवाईची शक्यता आहे का, याबाबत उत्सुकता वाढली आहे.

शिवानी कलमेकर प्रकरणाने तपास यंत्रणेच्या केवळ कार्यपद्धतीवरच प्रश्न उपस्थित केले नाहीत, तर निष्पाप व्यक्तींना झालेल्या मानसिक, सामाजिक आणि कायदेशीर त्रासाचाही मुद्दा अधोरेखित केला आहे.या प्रकरणात अंतिम जबाबदारी निश्चित होईपर्यंत जनतेचे लक्ष या घडामोडींवर राहणार आहे.

## गुणगौरवाच्या निमित्ताने उभे राहिले प्रेरणेचे चालते-बोलते विद्यापीठ

प्रतिनिधी ८ जून

**मलकापुर:** मराठा सेवा संघाच्या वतीने मलकापुर येथे आयोजित करण्यात आलेला सर्वधर्मीय गुणगौरव सोहळा हा केवळ विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम नव्हता, तर तो प्रेरणेचे चालते-बोलते विद्यापीठ ठरला. ६ जून २०२६ रोजी शिवराज्याभिषेक दिनाच्या पार्श्वभूमीवर संपन्न झालेल्या या कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील यशस्वी व्यक्तिमत्त्वांनी उपस्थिती लावल्याने विद्यार्थ्यांना यशाचे अनेक मार्ग एकाच ठिकाणी पाहायला मिळाले.

कार्यक्रमाच्या विचारपीठावर प्रशासनातील अधिकारी, अभियंते, शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, वकील, पत्रकार, उद्योजक, बँकिंग क्षेत्रातील तज्ज्ञ, अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवर तसेच कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे शेतकरी उपस्थित होते. या सर्वांचे जीवनप्रवास आणि कर्तृत्व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले.



आजच्या काळात विद्यार्थ्यांना अनेकदा योग्य दिशा आणि आदर्शांची गरज असते. या कार्यक्रमातून त्यांना विविध क्षेत्रांतील संधींची माहिती मिळाली. स्पर्धा परीक्षा, उद्योग, शिक्षण, कृषी, वैद्यकीय, पत्रकारिता आणि समाजसेवा या सर्व क्षेत्रांमध्ये प्रामाणिक परिश्रमातून यश मिळवता येते, याची जाणीव विद्यार्थ्यांना झाली.

कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे मान्यवर आणि कार्यकर्त्यांमधील साधेपणा. कोणताही दिखावा न करता सर्वांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगदान दिले. त्यामुळे हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणेचा आणि समाजासाठी अभिमानाचा विषय ठरला.

## विवाहितेचा छळ; पती, सासू सासऱ्यासह ८ जणांवर गुन्हा

प्रतिनिधी ८ जून

**जळगाव जामोद:** माहेरहून शेतीच्या कामासाठी दोन लाख रुपये आणण्याची मागणी करत विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी पती, सासू-सासरे व अन्य नातेवाईकांसह ८ जणांविरुध्द जळगाव जामोद पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रतिभा सारीपुत्र उर्फ मयुर मोरे (वय २७, रा. मेहकर, ह. मु. वडशिंगी, ता. जळगाव जामोद) यांच्या तक्रारीवरून आरोपी सारीपुत्र उर्फ मयुर प्रकाश मोरे, प्रकाश गोविंदराव मोरे, अनिता प्रकाश मोरे, नालंदा प्रकाश मोरे (सर्व रा. मेहकर), कांताबाई भिमराव मोरे, आकाश भिमराव मोरे (दोघे रा. शेलगाव देशमुख, ता. मेहकर), संजय ओंकार हिवाळे (रा. वळशी, ता. चिखली) व मधुकर सखाराम सरदार (रा. मेहकर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, २४ मे ते १३ जुलै २०२४ या कालावधीत आरोपींनी संगनमत करून फिर्यादीकडे माहेरहून शेतीच्या कामासाठी दोन लाख रुपये आणण्याचा तगादा लावला. मागणी पूर्ण न झाल्याने तिला शिवीगाळ, मारहाण करण्यात आली. तसेच तिच्या आर्थिक परिस्थितीवरून हिणवून जिवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. पैशांच्या कारणावरून सतत शारीरिक व मानसिक त्रास देण्यात आल्याचेही फिर्यादीने नमूद केले आहे.या प्रकरणी जळगाव जामोद पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (ँन्ए) कलम ८५, ११५(२), ३५२, ३५१ (३) व ३ (५) अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास ठाणेदार सचिन बागुल यांच्या मार्गदर्शनात सुरू आहे.

## पंचमुखी हनुमान मंदिर ते घिर्णी २०० वी पायदळ वारी सोहळा ११ जून रोजी; जय्यत तयारी

**मलकापुर:** जय गजानन हरिहर भजन मंडळ मलकापूर संचलित पंचमुखी हनुमान मंदिर मलकापूर, श्री क्षेत्र घिर्णी संत गजानन महाराजांच्या पायदळ वारीचे यंदाचे द्विशतक (२०० वी )असून, या ऐतिहासिक आणि भव्य वारी सोहळ्याचे आयोजन गुरुवार, दि. ११ जून २०२६ रोजी दुपारी चार वाजता करण्यात आले आहे. या विशेष वारीनिमित्त पंचक्रोशीतील भाविकांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण आहे. या विशेष वारी सोहळ्यात अश्व, पताका, भजन, कीर्तन आणि माऊलींचा मुखवटा रथ हे मुख्य आकर्षण असणार आहे. वारीचे पावित्र्य आणि शोभा वाढवण्यासाठी महिला भक्तांना पिवळी साडी आणि पुरुष भक्तांना पांढरा पोशाख व टोपी परिधान करण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. या ऐतिहासिक ( २०० ) व्या वारीचे औचित्य साधून विविध सामाजिक व धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे?. वारीमध्ये 'गजानन' नाव असणारे २०० माऊली भक्त विशेष रित्या सहभागी होणार आहेत. वारकरी बंधू-भगिनींनी काउंटर मशीनवर तब्बल २ कोटी ५१ लाख राम नाम जप केला आहे. वारीदरम्यान २०० वृक्षारोपण व संवर्धन रोपांचे वाटप केले जाईल.

## शेगाव शहरात बंद घर फोडून रोख रक्कम, मंगळसूत्र लंपास

**◆ अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल**

प्रतिनिधी ८ जून

**शेगांव:** शहरातील सावता नगर परिसरात देवदर्शनासाठी पुण्याला गेलेल्या कुटुंबाच्या बंद घरात अज्ञात चोरट्याने घरफोडी करून रोख रक्कम व सोन्याचे मंगळसूत्र, असा ४० हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी शेगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नितीन दिनकर जुमळे (वय ३७, रा. सावता नगर) हे कुटुंबासह देवदर्शनासाठी पुण्याला गेले होते. १ ते ६ जूनदरम्यान त्यांचे घर बंद होते. दरम्यान, घराचा कडीकोंडा तुटलेला असल्याचे घरमालकाच्या निदर्शनास आले. त्यांनी याबाबत जुमळे यांना माहिती दिल्यानंतर जुमळे तातडीने शेगावात परतले. घराची पाहणी केली असता बेडरूममधील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसून आले.

चोरट्याने कपाटाचे कुलूप व कडीकोंडा तोडून कपाटातील १२ हजार रुपये रोख रक्कम तसेच सुमारे चार ग्रॅम वजनाचे, २८ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेल्याचे उघड झाले. अशा प्रकारे एकूण सुमारे ४० हजार रुपयांचा ऐवज चोरीस गेला. जुमळे यांच्या फिर्यादीवरून शेगाव शहर पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३३१ (३), ३३१ (४) व ३०५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकॉ. नीलेश गाडगे करीत आहेत. दरम्यान, गेल्या आठवडाभरात बंद घरांना लक्ष्य केल्याच्या काही घटना समोर आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

## समृद्धी महामार्गावर उभ्या ट्रकला कारची धडक; एकाचा मृत्यू

**◆ नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा**

प्रतिनिधी ८ जून

**डोणगाव :** समृद्धी महामार्गावर नियमांचे उल्लंघन करून उभ्या करण्यात आलेल्या ट्रकला कारने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात एका प्रवाशाचा जागीच मृत्यू झाला, तर कारमधील इतर नातेवाईक गंभीर जखमी झाले. रविवारी (दि. ७) मध्यरात्री वाजण्याच्या १२.१५ सुमारास आंध्रुड शिवारातील चॅनल क्रमांक २७३.०२ जवळ ही दुर्घटना घडली. या अपघातात कृष्णा संगीत राठोड (वय २६) (रा. सोमनाथनगर, ता. मानोरा, जि. वाशिम) या प्रवाशाचा जागीच मृत्यू झाला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हेमंत अर्जुन चव्हाण (वय ३८, रा. मोख, ता. दिग्रस, जि. यवतमाळ) यांनी दिलेल्या. फिर्यादीवरून ट्रक चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.त्यांच्या नातेवाईकांचा प्रवास (क्र.एमएच-२९-बीपी-५५४३) या कारमधून समृद्धी महामार्गावर सुरू होता. दरम्यान, आंध्रुड शिवारातील चॅनल क्रमांक २७३.०२ जवळ ट्रक (क्र. एमएच-१५-बीजे-७६६५) चालकाने महामार्गावर वाहन उभे केले होते. महामार्गावर पार्किंगला परवानगी नसतानाही ट्रक रस्त्यावर उभा करण्यात आला होता, तसेच रात्रीच्या वेळी वाहनाची ओळख पटावी, यासाठी कोणतेही इंडिकेटर सुरू ठेवले नव्हते किंवा आवश्यक परावर्तित चिन्हेही लावण्यात आली नव्हती. काळोखामुळे रस्त्यावर उभा असलेला ट्रक चालकाच्या निदर्शनास न आल्याने कारने ट्रकला पाठीमागून जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की कारचा समोरील भाग पूर्णपणे चुराडा झाला. या अपघातात कृष्णा संगीत राठोड यांचा जागीच मृत्यू झाला. तर कारमधील इतर नातेवाईक गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर उपचार सुरु आहे.

## पक्ष्यांची तहान भागविण्यासाठी दुधी भोपळ्यापासून कमंडलु जलपात्र!

**देविदास शर्मा यांची संकल्पना : श्री सद्गुरु एकनाथ महाराज भजनी मंडळाचा २५ वर्षांपासून उपक्रम**

प्रतिनिधी ८ जून

**खामगाव :** 'प्राणीमात्रांवर दया करा' हा मूलमंत्र डोळ्यासमोर ठेवून येथील सतिफैल भागातील श्री सद्गुरु एकनाथ महाराज भजनी मंडळातर्फे संस्थापक अध्यक्ष देविदास शर्मा यांच्या संकल्पनेतून एक अभिनव उपक्रम साकार झाला. गेल्या अडीच दशकापासून (२५ वर्ष) दुधी भोपळ्यापासून जलपात्र तयार करून ते जलपात्र शहर व आजूबाजूच्या परिसरात ज्या भागात पक्ष्यांचा अधिवास अधिक आहे त्या ठिकाणी लावले जाते. या माध्यमातून पक्ष्यांची तहान भागविण्याचे कार्य करण्यात येत आहे.

केवळ जलपात्र लावून त्यांचे हे कार्य थांबत नाही तर उन्हाळ्याच्या दिवसात या भजनी मंडळाचे कार्यकर्ते हे दररोज सकाळी ज्या ठिकाणी जलपात्र लावण्यात आले आहे त्या ठिकाणी जाऊन त्यात शुद्ध व थंडगार पाणी भरतात. त्यांचे हे कार्य यंदा २० मार्चपासून सुरू झाले असून ६०० च्या वर जलपात्र लावण्यात आले आहेत. त्यांच्या या कार्याचे शहरातील सामाजिक संघटनांनी व पक्षी प्रेमींनी अनुकरण केले तर पक्ष्यांना तहान भागविण्यासाठी पाणी कुठे मिळते, यासाठी भटकंती करण्याची वेळ येणार नाही. एवढेच नव्हे तर पाण्याअभावी त्यांना आपला जीव गमविण्याची वेळ येणार नाही. यंदा हे जलपात्र बनविण्यासाठी भजनी मंडळाचे विनोद सुकाळे, दिलीप झापर्डे, लालाजी सांगळे, रामकृपाल शर्मा, अमर शर्मा, प्रेम शर्मा, आशा अंधारे, सुशिला आवलकर, संगिता वाघोळे, पार्वता सुकाळे, मंगला बावस्कर, जया सुकाळे, शकुंतला ढवळे, जयश्री झापर्डे व मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांचा सहभाग लाभला.





सन २००० पासून हा उपक्रम आजतागायत सुरु आहे. आतापर्यंत एकूण १३ हजार कमंडलू जलपात्र शहरातील वेगवेगळया भागात लावण्यात आले आहेत तर काहींचे मोफत वितरण करण्यात आले आहे.

**देविदास शर्मा,** संस्थापक अध्यक्ष
श्री सदगुरु एकनाय
महाराज भजनी मंडळ

### जलपात्र बनविण्यासाठी लागतात दोन महिने

दरवर्षी साधारण ७०० ते ८०० जलपात्र बनविण्यात येतात. दुधी भोपळयापासून जलपात्र तयार करण्याकरिता किमान २ महिने लागतात. हे जलपात्र नैसर्गिक, पर्यावरण पोषक असून पक्ष्यांना पाणी पिण्याकरिता योग्य ठरत आहे. या कमंडलू जलपात्राचे मोफत वितरण करण्यात येते. हे जलपात्र बनविण्याचा उपक्रम कदाचित संपूर्ण महाराष्ट्रातून एकमेव असावा. हे दुधी भोपळे तलावरोड, शेगाव रोड, घाटपुरी, अत्रंज, रोहणा, शहराजवळील आदी भागात फिरून तोडून आणण्यात आले होते. त्यानंतर त्याला वाळवून कमंडलूचा आकार देण्यात आला.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
सोमवार, दि. ८ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com



# जनतेच्या नशिबी रोज 'धुळवड', मंत्र्यांसाठी बसस्थानकात 'नंदनवन'

## ♦ एसटी महामंडळाचा व्हीआयपी ढोंगीपणा झाला उघड ! पंखे पण लागले

प्रतिनिधी ८ जून

**अकोला :** एसटी महामंडळाच्या अकोला आगार क्रमांक १ (टॉवर चौक बसस्थानक) मधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना रोज धुळीचे साम्राज्य आणि माती खावी लागत असताना, आज मात्र याच बसस्थानकाचे रूप पालटल्याचे पाहायला मिळाले. राज्याचे परिवहन मंत्री आज अकोला दौऱ्यावर येत असल्यामुळे, एरवी प्रवाशांच्या आरोग्याची 'धुळवड' करणाऱ्या एसटी प्रशासनाने आज मंत्र्यांच्या स्वागतासाठी थेट बसस्थानकात पाणी मारून, कुंड्या आणि हिरवळ लावून 'नंदनवन' उभे केले आहे. प्रशासनाचा हा ढोंगीपणा पाहून अकोलेकर प्रवाशांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. टॉवर चौकातील आगार क्रमांक १ ची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. बसस्थानकाच्या आवारात खड्डे आणि उखडलेल्या डांबरामुळे रोज इतका 'धुळा' उडतो की, येथे येणारे प्रवासी अक्षरशः माती खातात. धुळीच्या त्रासामुळे प्रवाशांना खोकला, दम्याचा त्रास आणि डोळ्यांचे आजार जडले आहेत. रोज हजारो प्रवासी या नरकयातना सहन करत असताना एसटी प्रशासनाने कधी साधे पाणी मारण्याचे सौजन्यही दाखवले नाही. अकोल्यातील राजकीय पक्ष, संघटना आणि सामाजिक कार्यकर्ते सुतावले असून त्यांच्या निष्काळजीपणाचा फटका अकोलेकरांना रोज बसतो.






### प्रवाशांना वाटला 'बगीच्या'त बसल्याचा फील !

◆ रोज धुळीच्या ढगांमध्ये बसणाऱ्या अकोलेकर प्रवाशांना आज अचानक रस्ते ओले आणि आजूबाजूला हिरवळ दिसल्याने आपण बस स्टँडवर आहोत की एखाद्या बगीच्यात, असा प्रश्न पडला. मात्र, हे सर्व जनतेसाठी नसून केवळ मंत्र्यांच्या डोळ्यात धूळफेक करण्यासाठी चालले आहे हे समजायला प्रवाशांना वेळ लागला नाही.

### मंत्र्यांच्या भीतीने पाण्याची उधळण आणि कुंड्यांचा देखावा !

परंतु, आज परिवहन मंत्र्यांची गाडी या बसस्थानकात येणार असल्यामुळे अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले. साहेबांच्या कपड्यांना आणि बुटांना धूळ लागू नये, म्हणून सकाळीच संपूर्ण बसस्थानकात पाण्याचा जोरदार शिडकाव करण्यात आला. एवढेच नव्हे, तर मंत्र्यांच्या डोळ्यांना सुखद वाटावे म्हणून रात्रीतून शेकडो शोभेच्या कुंड्या, झाडे आणि हिरवळ आणून बसस्थानक सुशोभित करण्यात आले.

### 'आम्ही काय जनावरे आहोत का?'

बसस्थानकातील या व्हीआयपी सुशोभीकरणावर प्रवाशांनी संताप व्यक्त केला आहे. 'आम्ही तिकीट काढून प्रवास करतो, एसटीला महसूल देतो, तरीही आमच्या वाट्याला रोज धुळ आणि माती! मंत्र्यांसाठी जर एका रात्रीत हिरवळ आणि कुंड्या येऊ शकतात, तर मग जनतेला स्वच्छ बसस्थानक का मिळू शकत नाही? आम्ही काय जनावरे आहोत का?' असा संतप्त सवाल प्रवाशांनी उपस्थित केला आहे. मंत्र्यांच्या दौऱ्यापुरता केलेला हा देखावा उद्या मंत्री जाताच पुन्हा धुळीत मिळणार, की प्रवाशांना ही स्वच्छतेची शिस्त रोज अनुभवायला मिळणार? याचे उत्तर एसटी महामंडळाच्या सुस्त अधिकाऱ्यांनी द्यावे, अशी मागणी आता अकोलेकर करत आहेत.

# परिवहन मंत्र्यांनी अस्वच्छतेबाबत दोन अधिकाऱ्यांना केले निलंबित !

## ♦ अमरावती बसस्थानकाला आकस्मिक भेट, विश्रांतीगृह, स्वच्छतागृहांची दुरवस्था

प्रतिनिधी ८ जून

**अमरावती :** राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक हे रविवारी रात्री सव्वादहा वाजताच्या सुमारास अमरावती मध्यवर्ती बसस्थानकावर पोहचले. शिवसेनेच्या मेळाव्याला उपस्थित राहून परतताना मंत्र्यांनी आपला ताफा अचानक बसस्थानकाकडे वळवल्याने एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची प्रचंड तारांबळ उडाली. या भेटीदरम्यान त्यांनी केवळ वरवरची पाहणी न करता बसस्थानकातील अंतर्गत व्यवस्था आणि प्रवासी सुविधांचा थेट आढावा घेतला. बसस्थानक परिसरातील अस्वच्छता पाहून ते प्रचंड संतापले. त्यांनी विभाग नियंत्रक आणि आगार व्यवस्थापकांना तत्काळ निलंबित करण्याचे आदेश दिले.

एसटी महामंडळाकडून आता दर तिकीटावर प्रत्येकी २ रुपये स्वच्छता कर आकारल्या जातो. असे असताना अमरावती बसस्थानक परिसरातील अस्वच्छता, चालक व वाहकांसाठी असलेल्या विश्रामगृहाची, स्वच्छता गृहांची दुरवस्था पाहून प्रताप सरनाईक संतप्त झाले आणि त्यांनी विभाग नियंत्रक सचिन डफळे आणि आगार व्यवस्थापक वैशाली भाकरे यांच्या निलंबनाचे आदेश दिले. परिवहन मंत्र्यांनी या भेटीची कोणतीही पूर्वसूचना न दिल्याने अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली. ते चालक आणि वाहकांसाठी असलेल्या विश्रांतीगृहात पोहचले. तिथे काही गाद्या व सतरंज्या पडलेल्या दिसल्या. याचवेळी शिवसेनेच्या एका पदाधिकाऱ्याने त्यांना सांगितले की, या गाद्या आजच आणल्या, एक कुलर सुद्धा आज आणला. याबाबत सरनाईक यांनी त्या विश्रामगृहात असलेल्या चालक आणि वाहकांना विचारणा केली असता, त्यांनीही या ठिकाणी केवळ सतरंज्या राहतात, स्वच्छता राहत नाही, एकच कुलर असतो, या ठिकाणी बाहेरील ऑटोचालक लोक येतात व झोपतात, असा तक्रारींचा पाढा त्यांच्या समोर वाचला. बसचालक, वाहकांना पिण्यासाठी थंड पाणी तर दूरच आंघोळीसाठी गरम पाणी देखील मिळत नसल्याची तक्रार यावेळी करण्यात आली. हे ऐकून संतप्त झालेल्या प्रताप सरनाईक यांनी बसस्थानकावरील ढिसाळ व्यवस्थापनाबाबत अधिकाऱ्यांना जाब विचारला.

# समृद्धी महामार्गावर भीषण अपघात; प्रवासी बसमध्येच अडकले !



प्रतिनिधी ८ जून

**बुलडाणा :** समृद्धी महामार्गावर अपघातांची मालिका सुरुच असून, सोमवारी पहाटे एक भीषण अपघात झाला. यामध्ये २५ जण जखमी झाले आहेत.

समृद्धी महामार्गावर मेहकरजवळील पिंपरी माळी गावाजवळ सोमवारी पहाटे खाजगी प्रवासी बसचा भीषण अपघात झाला. या अपघातात अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. बाबा ट्रॅव्हल्सच्या लक्झरी बसने ट्रकला पाठीमागून जोरदार धडक दिली. ही धडक इतकी जोरदार होती की लक्झरी बसच्या पुढच्या भागाचा चेंदामेंदा झाला आहे. गेल्या एक ते दीड तासांपासून काही प्रवासी लक्झरी बसमध्ये अडकून पडल्याची माहिती आहे. ही खाजगी प्रवासी बस पुण्याहून नागपूरच्या दिशेने जाताना हा अपघात झाला. प्राथमिक माहितीनुसार, या अपघातामध्ये २० ते २५ प्रवासी जखमी झाले असून दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. वृत्त लिहिपर्यंत सविस्तर माहिती मिळू शकली नाही.

# डिझेल खरेदी संदर्भाच्या परिपत्रकाने कोलमडणार अत्यावश्यक सेवा

## ♦ रुग्णालय, बँका, एटीएम, कोल्ड स्टोरेज, शेती क्षेत्राला बसणार फटका

प्रतिनिधी ८ जून

**अकोला :** अमेरिका इराण युद्धामुळे देशात इंधनाचे संकट निर्माण झाले आहे त्यामुळे पेट्रोल व डिझेलची साठेबाजी मोठ्या प्रमाणात वाढत आहे इंधनाच्या साठेबाजी वर अंकुश ठेवण्यासाठी राज्य शासनाने डिझेल खरेदी व पुरवठा संदर्भातील नवे परिपत्रक जारी केल्याने राज्यात मोठा संभ्रम निर्माण झाला आहे या परिपत्रकातील जाचक अटींमुळे लाखो प्रामाणिक ग्राहकांना त्रास होण्याची शक्यता वर्तवली जात आहे जमाखोरी आणि काळाबाजार विरोधातील शासकीय कारवाईचे नागरिक समर्थन करीत आहेत मात्र या नव्या नियमांमुळे पेट्रोल पंप चालक प्रामाणिक ग्राहकांनाही डिझेल देण्यास टाळाटाळ करू



शकतात त्यामुळे डिझेल जनरेटर वर अवलंबून असणारी रुग्णालय बँका एटीएम टेलिकॉम टॉवर्स कोल्ड स्टोरेज लघुउद्योग गृहनिर्माण संस्था आणि शेती क्षेत्राला मोठा फटका बसून गोंधळाची स्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे बेकायदेशीर मोठी खरेदी करणारे आणि जनरेटर तसेच आपत्कालीन वीस पुरवठ्यासाठी डिझेल लागणारे वैध ग्राहक त्यांच्यात शासनाने फरक स्पष्ट करावा तसेच प्रामाणिक ग्राहकांना अडथळा येऊ नये म्हणून सोपी पडताळणी आणि स्वघोषणा प्रणाली लागू करावी तसेच जिल्हा आणि तालुका पातळीवर निर्माण झालेला संभ्रम दूर करण्यासाठी शासनाने तात्काळ मार्गदर्शक सूचना जारी कराव्यात त्यामुळे उद्योग व्यापार आणि अत्यावश्यक सेवांचे नुकसान होणार नाही अशी मागणी पेट्रोल व डिझेलवर अवलंबून असणारे व्यावसायिक करीत आहेत

# भागवत कथा भक्ती, ज्ञान आणि वैराग्याची प्राप्ती करून देणारी दिव्य नौका : पंडित सुदर्शनजी शर्मा

## गोकुळ धाममध्ये रंगला श्रीमद् भागवत ज्ञानयज्ञाचा प्रथम सोहळा; भक्तीरसात न्हाली दत्त कॉलनी







प्रतिनिधी ८ जून

**अकोला :** 'श्रीमद् भागवत महापुराण हे संसारातील त्रिविध ताप आणि दुःख दूर करणारे साक्षात वाङ्मयी स्वरूप आहे. कलियुगात हरीनामाचे महत्त्व अगाध असून, भवसागर पार करण्याची ताकद केवळ भगवंताच्या नामस्मरणातच आहे. देवाला प्रसन्न करण्यासाठी बाह्य अवडंबराची नव्हे, तर केवळ शुद्ध आणि अनन्य भक्तीचीच गरज असते,' असे परम पावन उद्गार सुप्रसिद्ध कथाव्यास पंडित सुदर्शनजी शर्मा शास्त्री यांनी काढले.

गोरक्षण रोडवरील दत्त कॉलनीतील 'गोकुळ धाम' येथे परम पूज्य कै. पुंडलिकराव बंकटराव उपाख्य अण्णासाहेब देशमुख यांच्या पवित्र स्मृतीप्रत्यर्थ, देशमुख परिवाराच्या वतीने अत्यंत पवित्र अशा 'पुरुषोत्तम मासाचे' औचित्य साधून श्रीमद् भागवत सप्ताहाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या ज्ञानयज्ञाचा शुभारंभ ७ जून रोजी अत्यंत भक्तीमय वातावरणात झाला. कथेचे पहिले पुष्प गुंफताना व्यासपीठावरून पंडित सुदर्शनजी शर्मा यांनी भागवत महात्म्य विशद केले. ते म्हणाले की, ही कथा श्रवण केल्याने मानवातील काम, क्रोध, लोभ हे दोष नष्ट होऊन भक्ती, ज्ञान आणि वैराग्याची प्राप्ती होते. पहिल्या दिवशी त्यांनी बद्रीश्रमातील देवर्षी नारद आणि सनत कुमार यांचा अलौकिक संवाद, तसेच आत्मदेव-धुंधुली आणि गोकर्ण-धुंधुकारी यांच्या जन्माची परम पावन कथा रसाळ भाषेत सादर केली. हा भक्तीचा अनुपम सोहळा ऐकताना उपस्थित भाविक मंत्रमुग्ध होऊन कृष्णचरणात लीन झाले होते. 'एक तर अत्यंत पवित्र असा 'पुरुषोत्तम मास' (अधिक मास) आणि त्यात श्रीमद् भागवत कथेचे श्रवण... हा अत्यंत दुर्लभ असा दुग्धशर्करा योग आहे. पूर्वपुण्याई असल्याशिवाय अशा कथेचा लाभ मिळत नाही,' असे पंडितजींनी आवर्जून सांगितले. या ७ ते १३ जून दरम्यान चालणाऱ्या ज्ञानयज्ञाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वृंदावन येथील परमेश्वरदासजी यांच्या दिव्य मार्गदर्शनाखाली दररोज भगवान श्रीकृष्णाच्या विविध लीलांचे नयनरम्य आणि आकर्षक देखावे सादर केले जाणार आहेत. पहिल्या दिवसाच्या कथेची सांगता महाआरती आणि महाप्रसादाने झाली. या अमृतमय कथेचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### मुख्य यजमानांकडून ग्रंथपूजन आणि संतांचे स्वागत

या मंगलप्रसंगी आर. आर. सी. नेटवर्कचे संस्थापक संचालक प्रदीप उपाख्य बंडूभाऊ देशमुख, सौ. कल्पनाताई देशमुख, कार्यकारी संचालक पंकज देशमुख आणि सौ. ऋतुजा देशमुख यांनी श्रीमद् भागवत ग्रंथाचे मनोभावे पूजन करून व्यासपीठाची आरती केली. तसेच कथाव्यास पंडित सुदर्शनजी शर्मा यांचे शाल-श्रीफळ देऊन भावपूर्ण स्वागत केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला नयनाताई देशमुख यांनी सर्व भाविक भक्तांचे अगत्याने स्वागत केले. देशमुख परिवारातील प्रदीप देशमुख, पंकज देशमुख, चिन्मय देशमुख, स्मित देशमुख, दिनेश देशमुख, तनुज देशमुख आणि क्रिष देशमुख यांनी कथेमध्ये सहभागी असणाऱ्या सर्व विद्वानांचे आदरातिथ्य केले.

### संगीत आणि मंत्रोच्चाराने कथेला लाभली दिव्य अनुभूती

या कथेला आध्यात्मिक आणि संगीतमय उंचीवर नेण्यासाठी अनेक विद्वान ब्राह्मण आणि कलाकारांची मांदियाळी लाभली आहे. भागवताचे मूळ पाठ करणारे पंडित शैलेंद्रजी शर्मा, विष्णू सहस्त्रनाम पाठ करणारे पंडित अजय शर्मा, तसेच द्वादशाक्षर (ॐ नमो भगवते वासुदेवाय) मंत्राचा विधीवत जप करणारे पंडित धीरज तिवारी आणि पं. अनुरागजी तिवारी यांच्या मंत्रोच्चाराने परिसर पवित्र झाला आहे. वृंदावनचे सुप्रसिद्ध बासरी वादक पं. देवकीनंदन शर्माजी यांच्या बासरीचे सूर, मधुर भजन गायक अजयजींचे गायन, पियानो वादक गोपालजी, तबला वादक प्रशांतजी आणि ऑक्टोपॅड वादक अजिंक्यजी यांच्या सुश्राव्य संगीताने कथेची रंगत अधिकच वाढवली.





हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK